# दैनिक सिंहवाणी वृत्त

प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर · संचालक-संपादक : अजय बिवडे


**सोने-चांदी**

- २४ कॅरेट : १,४८,७०० /-
- २३ कॅरेट : १,३६,३५० /-
- चांदी : २,४८,३००/-


Hotel Mai VilLa

Ac/Non Ac Room Available

Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur

- Contact No -

7796116694

9730107075



Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : बुधवार, ७ ऑक्टोबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ८ | वर्ष : १ | अंक : २९८ | किंमत : २ रूपये




संपादकीय लेखणीतून...

## विश्व कापूस दिन : शेतकऱ्यांच्या योगदानाचा सन्मान

आंतरराष्ट्रीय किंवा जागतिक कापूस दिन दरवर्षी ७ ऑक्टोबरला साजरा केला जातो. कापूस या महत्त्वपूर्ण पीकाचे जागतिक अर्थव्यवस्थेतील महत्त्व अधोरेखित करण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या योगदानाला सन्मान देण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्रांच्या अविभाज्य विकास संघटनेने २०१९ साली जागतिक कापूस दिनाची स्थापना केली. कापूस हे केवळ वस्त्रउद्योगातच नव्हे तर अनेक औद्योगिक उत्पादनांमध्ये वापरले जाते. कापसाच्या उत्पादनामुळे लाखो शेतकऱ्यांना रोजगार मिळतो. विशेषतः भारतासारख्या देशांमध्ये, कापसाचे उत्पादन ग्रामीण अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा भाग आहे.

जागतिक कापूस दिनानिमित्ताने कापूस उद्योगातील शाश्वत विकास, तंत्रज्ञान, आणि शेतकऱ्यांना दिला जाणारा पाठिंबा याबाबत जागरूकता वाढवली जाते. यामुळे शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान आणि बाजारपेठांपर्यंत प्रवेश मिळवून देण्याचे महत्त्व अधोरेखित होते. यंदाच्या जागतिक कापूस दिनाचा मुख्य उद्देश कापूस उत्पादनाच्या शाश्वत पद्धतींवर आणि शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारण्यावर भर देणे आहे. भारतात व महाराष्ट्रात कापूस हे एक महत्त्वाचे नगदी पीक आहे, ज्याला पांढरे सोने म्हणूनही ओळखले जाते. अत्यावश्यक माहिती-

जमीन आणि हवामान : जमीनः चांगल्या निचऱ्याची व सुपीक काळी माती कापसासाठी उत्तम असते. जमिनीचा सामू ६ ते ८.५ असावा लागतो.

हवामानः हे उष्ण व दमट हवामानातील पीक आहे. वाढीसाठी १५ ते ३५ से. तापमान योग्य असते.

लागवड आणि बियाणेः पेरणीची वेळः जून ते जुलै- खरीप हंगाममध्ये पाऊस सुरू झाल्यावर पेरणी केली जाते. बियाणे प्रमाणः हेक्टरी योग्य अंतर राखून बीटी कापसाची लागवड करतात. कोरडवाहूसाठी ३ बाय ४ किंवा ४ बाय ४ फूट आणि बागायतीसाठी ५ बाय २ किंवा ६ बाय ३ फूट अंतर ठेवावे लागते.

रासायनिक खतेः बागायती बीटी कापसासाठी हेक्टरी १२०:६०:६० किलो नत्र, स्फुरद व पालाश द्यावे लागते.

पाडलेले टप्पेः पेरणीच्या वेळी, ३० दिवसांनी आणि ६० दिवसांनी योग्य प्रमाणात युरिया व इतर खतांचे सामने द्यावे लागतात.

पाणी व किडींचे व्यवस्थापनः पाणीः पिकाला ८०० ते ९०० मिमी पाण्याची गरज असते. ठिबक सिंचनाचा वापर केल्यास उत्पादनात वाढ होऊ शकते, असे सांगतात.

कीड नियंत्रणः पात्या व बोंडे गळ रोखण्यासाठी तसेच गुलाबी बोंडअळी व रस शोषक किडींपासून संरक्षण करण्यासाठी योग्य किटकनाशकांची फवारणी करावी लागते.

रुई याच्याशी गल्लत करू नका. कापूस हा वनस्पतीपासून मिळणारा आणि सेल्युलोजयुक्त तंतू पूर्वापार मोठ्या प्रमाणात वापरला जाणारा धागा आहे. कापूस हे एक नगदी पीक आहे. कापसाला पाण्याचे आकर्षण आहे. सुती कपडे घातल्यास हाच गुणधर्म घाम टिपून घ्यायला मदत करतो. म्हणूनच उष्ण कटिबंधातील देशात सुती कपडे प्राधान्याने वापरतात. कापूस खूप मऊ असतो. कापसाला पांढरे सोने-व्हाईट गोल्ड म्हटल्या जाते. महाराष्ट्रातील यवतमाळ जिल्ह्याला "पांढऱ्या सोन्याचा जिल्हा" म्हणून ओळखल्या जाते. कापसाच्या बियांना सरकी म्हणतात. सरकी हे गुरांचे खाद्य आहे, तर सरकीचे तेल स्वयंपाकासाठी वापरायचे एक स्वस्त तेल आहे. या तेलाचा साबणात आणि अन्य व्यवसायांत वापर होतो. कापसामध्ये जवळपास ९५ % सेल्युलोज असते. कपसाच्या एका नवीन जातीचा शोध लागला आहे, नाव आहे "सावरी".मराठी-हिंदीमध्ये कापसाला रुई अस प्रतिशब्द आहे. मात्र "रुई" या विषारी वनस्पतीचा आणि कापसाचा काही संबंध नाही. असे असले तरी रुईच्या झाडापासूनही एक प्रकारचा अतिशय मऊ कापूस मिळतो, त्याच्या गाद्या-उश्या करतात. रुईच्या झाडापासून निसटलेला हा मऊ कापूस दशदिशांना उधळत असतो.

इतिहास : साधारणतः इसवी सन पूर्व ७०० वर्षापूर्वीपासून भारतीय उपखंडात कापसाची शेती केली जाते. याचा पुरावा पाकिस्तानातील मेहरगढ या ठिकाणी झालेल्या उत्खननातून मिळाला. हजारो वर्षांपूर्वी प्राचीन भारत, चीन आणि इजिप्तमध्ये कापसाच्या धाग्यांपासून कपडे तयार केले जात. कापसापासून मिळणारे धागे पाच प्रकारचे असतात. अतिशय लांब- १-३/८ इंच आणि त्याहूनही लांब, लांब १-१/८ इंच ते १-११/३२ इंच, मध्यम लांब- १-१/३२ इंच ते १-३/३२ इंच, मध्यम-१३/१६ इंच ते १ इंच, आणि आखूड- १३/१६ इंचापेक्षा कमी लांबीचा. कापूस वेचणी- उत्पादनः अमेरिका, अर्जेंटिना, उजबेकिस्तान, ऑस्ट्रेलिया, चीन, तुर्कस्थान, तुर्कमेनिस्तान, पाकिस्तान, ब्राझील, भारत या देशांमध्ये कापूस पिकतो. अमेरिकेच्या राष्ट्रीय कापूस परिषद २०११ च्या अहवालानुसार जगातील पाच अग्रेसर कापूस उत्पादक देश : (१) अमेरिका (२) भारत, (३) ब्राझील, (४) ऑस्ट्रेलिया आणि (५) उझबेकिस्तान हे होत.

# मानवतेचा संपुष्टात येणारा श्वास: रशिया-युक्रेन युद्धाची साडेचार वर्षे

**प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल**
**वर्धा**

रशिया-युक्रेन युद्धाला साडेचार वर्षे पूर्ण झाली असून, हे युद्ध आधुनिक इतिहासातील सर्वात विनाशकारी आणि प्रदीर्घ संघर्षांपैकी एक बनले आहे. २४ फेब्रुवारी २०२२ रोजी सुरू झालेल्या या युद्धाने केवळ दोन्ही देशांचेच नव्हे, तर संपूर्ण जगाचे सामाजिक, आर्थिक आणि मानवतावादी संतुलन बिघडवून टाकले आहे.

रशिया-युक्रेन युद्धाच्या पार्श्वभूमीवर २ ऑगस्ट २०२६ रोजी रशिया आणि युक्रेन दरम्यान भीषण हवाई हल्ले झाले, याचबरोबर युक्रेनचे रशियाच्या हद्दीत खोलवर ड्रोन हल्ले झाले आहे. ज्यात एकूण १४ जणांचा मृत्यू झाला. रशियाने युक्रेनच्या झापोरिझिया, कीव्ह आणि खार्किव शहरांवर गाईडेड बॉम्ब आणि क्षेपणास्त्रांचा मारा केला, ज्यामुळे खार्किवमधील 'नोव्हा पोश्ता' गोदामाचे मोठे नुकसान झाले. याला प्रत्युत्तर म्हणून युक्रेनने बचावात्मक पवित्रा सोडून थेट रशियाच्या हद्दीत खोलवर ड्रोन हल्ले केले. युक्रेनने रशियातील साराटोव्ह रिफायनरी, एंजल्स एअरबेस आणि 'वाइल्डबेरीज' गोदामाला लक्ष्य केले. दोन्ही बाजूंनी एकमेकांच्या दळणवळण आणि रसद साखळीवर मोठे आघात केल्याचे यातून दिसून येते.

आज जगातील तथाकथित महासत्ता आणि शांततेचे ठेकेदार डोळ्यांवर पट्टी बांधून बसले आहेत. २४ फेब्रुवारी २०२२ रोजी सुरू झालेल्या रशिया आणि युक्रेन युद्धाला आता ४.५ वर्षे पूर्ण होत आहेत. या प्रदीर्घ आणि रक्तरंजित संघषार्ने जागतिक राजकारणाचा अत्यंत विद्रुप, स्वार्थी आणि अमानुष चेहरा जगासमोर आणला आहे. २ ऑगस्ट २०२६ हा या ४.५ वर्षांच्या युद्धातील असाच १ अत्यंत भीषण आणि काळाकुट्ट दिवस ठरला. या १ दिवसात रशिया आणि युक्रेनने एकमेकांवर केलेल्या विनाशकारी हवाई हल्ल्यांमध्ये १४ निष्पाप नागरिकांचा आणि सैनिकांचा हकनाक बळी गेला. हा आकडा केवळ १४ पुरता मर्यादित नाही, तर तो जागतिक व्यवस्थेच्या अपयशाचा आणि हरवत चाललेल्या माणुसकीचा सर्वात मोठा पुरावा आहे. एकविसाव्या शतकात विज्ञानाने एवढी प्रगती करूनही मानवजात स्वतःला विनाशाच्या खाईत कशी लोटत आहे, याचे हे सर्वात ज्वलंत आणि भयानक उदाहरण आहे.

२ ऑगस्ट २०२६ रोजी रशियाने युक्रेनच्या झापोरिझिया, कीव्ह आणि खार्किव या महत्त्वाच्या शहरांवर अत्यंत विनाशकारी आणि प्रगत अशा गाईडेड ग्लाइड बॉम्बचा मारा केला. हे अद्ययावत बॉम्ब केवळ लष्करी तळांनाच नव्हे, तर नागरी वस्त्यांना आणि दळणवळणाच्या साधनांना बेचिराख करण्यासाठी वापरले गेले. खार्किवमधील 'नोव्हा पोश्ता' या कुरिअर आणि टपाल गोदामाला लक्ष्य करून रशियाने युक्रेनची अंतर्गत रसद साखळी आणि सामान्य जनतेची जीवनवाहिनी उद्ध्वस्त करण्याचा क्रूर प्रयत्न केला. यामागील रणनीती अतिशय स्पष्ट आहे; शत्रूला केवळ सीमेवर हरवणे नाही, तर त्याच्या देशातील सामान्य नागरिकांचे जगणे मुश्कील करून त्यांचे मानसिक खच्चीकरण करणे. घरे, इस्पितळे, शाळा आणि व्यावसायिक गोदामे यांच्यावर होणारे हे हल्ले युद्धाचे सर्व आंतरराष्ट्रीय नियम आणि मानवी हक्क उघडपणे पायदळी तुडवणारे आहेत.

या अमानुष हल्ल्यांना युक्रेनने दिलेले प्रत्युत्तरही तितकेच आक्रमक आणि विध्वंसक होते. केवळ स्वतःच्या सीमांच्या आत राहून बचावात्मक युद्ध लढण्याचे धोरण युक्रेनने आता पूर्णपणे सोडून दिले आहे. २ ऑगस्ट २०२६ रोजी युक्रेनने थेट रशियाच्या हद्दीत शेकडो किलोमीटर आत घुसून अचूक ड्रोन हल्ले केले. यामध्ये रशियातील साराटोव्ह इंधन रिफायनरी, बॉम्बर विमानांचे प्रमुख उड्डाण केंद्र असलेला एंजल्स एअरबेस आणि 'वाइल्डबेरीज' या महाकाय ई-कॉमर्स कंपनीच्या गोदामाचा समावेश होता. समोरासमोरच्या लढाईसोबतच एकमेकांच्या अर्थव्यवस्थेला, ऊर्जा पुरवठ्याला आणि पायाभूत सुविधांना मुळासकट उखडून टाकण्याचे धोरण आता दोन्ही देशांनी उघडपणे स्वीकारले आहे. याच दिवशी रशियाने तब्बल ११५८ युक्रेनियन ड्रोन पाडल्याचा दावा केला. हे आकडे केवळ युद्धाची व्याप्ती सांगत नाहीत, तर माणसांऐवजी यंत्रे आणि कृत्रिम बुद्धिमत्तेने या युद्धाचा ताबा कसा घेतला आहे, याचे भयानक वास्तव मांडतात.

गेल्या ४.५ वर्षांचा मृत्यूचा आणि विनाशाचा हिशोब मांडायचा झाला, तर ते आकडे कोणत्याही संवेदनशील माणसाच्या अंगावर काटा आणणारे आहेत.

या युद्धात आतापर्यंत तब्बल २०,००,००० सैनिकांची जीवितहानी (मृत्यू आणि गंभीर जखमी) झाली आहे. यामध्ये १२,००,००० रशियन सैनिक तर जवळपास ६,००,००० युक्रेनियन सैनिकांचा समावेश आहे. याशिवाय हजारो सामान्य नागरिकांनी, लहान मुलांनी आणि महिलांनी आपला जीव गमावला आहे. आकाशातून आगीचा पाऊस पाडणाऱ्या ५०,००० हून अधिक ड्रोन आणि क्षेपणास्त्रांचा वापर दोन्ही बाजूंनी झाला आहे. केवळ २०२५ या १ वर्षात रशियाने ५०,००० हून अधिक शाहेद ड्रोन युक्रेनवर डागले. सप्टेंबर २०२४ नंतर दर आठवड्याला सरासरी ९०० ड्रोन हल्ले आणि ३०० हून अधिक मोठ्या बॉम्बफेकीच्या घटना घडत आहेत. दोन्ही बाजूंनी लाखो तोफगोळे डागले गेले आहेत. युक्रेनची संपूर्ण पायाभूत सुविधा आज राखेत मिसळली आहे. एका संपूर्ण पिढीचे भविष्य या युद्धाच्या खाईत भस्मसात झाले आहे.

हा संघर्ष आता केवळ दोन देशांच्या सीमेवरील लष्करी तळांपुरता मर्यादित राहिलेला नाही, तर त्याने संपूर्ण जागतिक अर्थव्यवस्थेला वेठीस धरले आहे. इंधन रिफायनरी आणि व्यावसायिक गोदामांवरील थेट हल्ल्यांमुळे जागतिक पुरवठा साखळी आणि आंतरराष्ट्रीय कच्च्या तेलाचे बाजार कोलमडून पडले आहेत. अन्नधान्य आणि ऊर्जेच्या तुटवड्यामुळे जगभरात महागाईचा आगडोंब उसळला आहे. संयुक्त राष्ट्र आणि पाश्चिमात्य महासत्ता या नरसंहारावर केवळ कागदी इशारे आणि निर्बंधांचा खेळ खेळण्यात मग्न आहेत. पडद्यामागे शस्त्रास्त्रांचे उत्पादन करणाऱ्या बड्या जागतिक कंपन्या अब्जावधींचा नफा कमावून आपली तिजोरी भरत आहेत, तर रशिया आणि युक्रेनमधील सामान्य माणूस मात्र या महासत्तांच्या राजकीय साठमारीत दररोज जिवंतपणी होरपळत आहे.

या सगळ्यातून एक अत्यंत मूलभूत आणि अस्वस्थ करणारा प्रश्न उरतो की, या अमानुष रक्तपातातून साध्य तरी काय होणार आहे? सत्तेच्या अहंकारात, इगोमध्ये आणि भौगोलिक वर्चस्वाच्या लालसेत अंध झालेले नेते हे समजायला तयार नाहीत की, शस्त्रांच्या आणि तलवारीच्या जोरावर मिळवलेला विजय हा नेहमी मानवतेचा आणि संस्कृतीचा सर्वात मोठा पराभव असतो. युद्ध हे कधीही, कोणत्याही आंतरराष्ट्रीय प्रश्नाचे अंतिम उत्तर असू शकत नाही; ते फक्त मृत्यूचा हिशेब, राखेचे ढिगारे आणि पिढ्यानपिढ्या चालणारा द्वेष मागे ठेवते.

२ ऑगस्ट २०२६ च्या या महाविनाशकारी घटनांनी संपूर्ण जगाला पुन्हा एकदा १ अत्यंत स्पष्ट इशारा दिला आहे की, जर हे क्रूर हल्ले त्वरित थांबले नाहीत आणि मुत्सद्देगिरीच्या माध्यमातून शांतता प्रस्थापित झाली नाही, तर हे जग एका अशा महाभयंकर तिसऱ्या जागतिक महायुद्धाच्या गर्तेत ओढले जाईल, जिथून परत येणे कोणत्याही महासत्तेला शक्य होणार नाही.

- ९५६१५९४३०६

# बुमराहशी पंगा साहिबजादा फरहानला नडला, अहंकाराचा फुगा फुटला अन् थेट हॉस्पिटल गाठले!

**डॉ.दत्ता विघावे**
**क्रिकेट समिक्षक**

एशियन गेम्स २०२६ मधील भारत विरुद्ध पाकिस्तान हा सुवर्णपदकाचा महामुकाबला केवळ पदकासाठीची लढत नव्हता, तर तो मैदानातील जुन्या हिशोबांची परतफेड ठरणारा ठरला. जसप्रीत बुमराहसारख्या जागतिक दर्जाच्या गोलंदाजाला डिवचणे किती महागात पडू शकते, याचा धडधडीत प्रत्यय पाकिस्तानचा कर्णधार साहिबजादा फरहानला या ऐतिहासिक अंतिम सामन्यात आला.

**तो विक्रम, दोन षटकार आणि फरहानचा बळावलेला अहंकार**

मागच्या आशिया चषकातील त्या सामन्यापूर्वी आंतरराष्ट्रीय स्तरावर जसप्रीत बुमराहच्या गोलंदाजीवर षटकार खेचणे जवळपास अशक्य मानले जात होते. संपूर्ण स्पर्धेत आणि त्याआधीच्या अनेक सामन्यांत बुमराहविरुद्ध एकाही फलंदाजाला षटकार मारता आला नव्हता. मात्र, त्या सामन्यात साहिबजादा फरहानने बुमराहला एकाच षटकात दोन लागोपाठ षटकार ठोकण्याचा अनपेक्षित पराक्रम केला.

एका जागतिक अव्वल गोलंदाजावर मिळवलेल्या या तात्पुरत्या यशाने फरहानचा अहंकार कमालीचा वाढवला. पाकिस्तान क्रिकेट वतुर्ळात त्याचे एवढे अवाजवी स्तोम माजवले गेले की, त्या दोन षटकारांवर चक्क विशेष डॉक्युमेंट्री बनवण्यात आली. स्वतःला बुमराहवर वर्चस्व गाजवणारा फलंदाज भासवण्याचा हा बालिश प्रयत्न होता. कर्णधारपद मिळाल्यानंतर तर हा माज अधिकच डोक्यात गेला होता.

**एशियन गेम्स २०२६ फायनलः बुमराहचा सणसणीत बाउन्सर आणि विकेट!**

सुवर्णपदकाच्या या अत्यंत प्रतिष्ठेच्या सामन्यात जेव्हा भारत आणि पाकिस्तान आमनेसामने आले, तेव्हा साहिबजादा फरहान त्याच हवेत फलंदाजीला उतरला. पण समोर शांत, संयमी आणि तितकाच घातक जसप्रीत बुमराह उभा होता. बुमराहने शब्दांची कसलीही देवाणघेवाण न करता आपल्या हातातील पांढऱ्या चेंडूने उत्तर देण्याचे ठरवले होते.

बुमराहने टाकलेला एक अतिशय भेदक, वेगाचा आणि शरीराचा वेध घेणारा बाउन्सर इतका अचूक होता की फरहानला बचावासाठी वेळच मिळाला नाही. चेंडू थेट त्याच्या बरगड्यांवर प्रचंड वेगाने आदळला. वेदनेने कळवळत असतानाच फरहानची एकाग्रता पूर्णपणे ढासळली, चेंडूवरचा ताबा सुटला आणि तो बाद होऊन पॅव्हेलियनमध्ये परतला. तो केवळ जखमी होऊन रिटायर्ड हर्ट झाला नाही, तर बुमराहने त्याला थेट मैदानाबाहेरचा रस्ता दाखवून आपली शिकार बनवले.

**रुग्णालयात मुक्काम आणि क्रिकेटचे कटू वास्तव**

बरगड्यांना जबर मार लागल्यामुळे सामन्यादरम्यानच त्याची प्रकृती खालावली. अखेर त्याला तातडीने पाकिस्तानातील रुग्णालयात दाखल करण्यात आले असून तो सध्या तेथे वैद्यकीय उपचार घेत आहे. या संपूर्ण नाट्याने क्रिकेट जगताला काही स्पष्ट संदेश दिले आहेतः

दोन षटकार म्हणजे वर्चस्व नव्हेः - बुमराहला तोपर्यंत कुणी षटकार मारला नव्हता म्हणून मारलेले दोन फटके एखाद्या खेळाडूला बुमराहपेक्षा श्रेष्ठ बनवू शकत नाहीत.

डॉक्युमेंट्रीने मॅच जिंकता येत नाहीः - मैदानाबाहेरील प्रसिद्धी आणि सोशल मीडियावरील पीआर स्टंट १४०+ किमी वेगाने उसळणाऱ्या बुमराहच्या चेंडूचा सामना करू शकत नाहीत.

अहंकाराचे रूपांतर पराभवातः सुवर्णपदकाच्या अंतिम सामन्यात जबाबदारीने खेळण्याऐवजी जुन्या अहंकाराचे प्रदर्शन मांडणे फरहानलाच नव्हे, तर संपूर्ण पाकिस्तान संघाला महागात पडले.

जसप्रीत बुमराहने शांत राहून घेतलेली ती बहुमूल्य विकेट आणि पाकिस्तानच्या कर्णधाराला दाखवलेला तंबूचा रस्ता, हा क्रिकेटच्या इतिहासातील अहंकारावर कौशल्याने मिळवलेला एक जबरदस्त विजय ठरला आहे.

बुमराहच्या डोक्यात फरहान बाबत राग असेलच मात्र त्याच सामन्यात भारताचा अल्पवयीन खेळाडू वैभव सूर्यवंशीला बाद केल्यानंतर दुसरा पाकिस्तानी खेळाडू सैम आयुबने पोरकट इशारे केल्यामुळे बुमराहसह संपूर्ण भारतीय खेळाडू पेटून उठले. परिणामतः भारताने या सामन्यात नेहमी प्रमाणे नांग्या ठेचून सुवर्णपदकावर नाव कोरले.

- ९०९६३७२०८२

# घट मातीचा, संदेश जीवनाचा

**शशिकांत म.तोटे**
**जि.यवतमाळ**

*या देवी सर्वभूतेषु शक्तिरूपेण संस्थिताः*

या मंत्रघोषाने नवरात्रोत्सवाच्या महापावन पर्वाला लवकरच प्रारंभ होत आहे. नवरात्र म्हणजे केवळ देवीची पूजा, उपवास आणि उत्सव नव्हे; तर शक्तीची उपासना, निसर्गाशी नाते आणि जीवनमूल्यांची पुनर्स्थापना करणारे भारतीय संस्कृतीचे एक समृद्ध पर्व आहे. या पर्वाची सुरुवात होते ती अश्विन प्रतिपदेच्या घटस्थापनेने. मातीच्या एका साध्या घटात भारतीय संस्कृतीत मानवी जीवनाचे विराट तत्त्वज्ञान सामावले आहे.

पौराणिक कथेनुसार, महिषासुराच्या अत्याचाराने देवतांसह संपूर्ण सृष्टी त्रस्त झाली होती. त्याचा संहार करण्यासाठी देवतांच्या शक्ती एकवटल्या आणि आदिशक्ती दुर्गेचे प्राकट्य झाले. नऊ दिवस देवी आणि महिषासुर यांच्यात युद्ध झाले आणि अखेर विजय सत्याचा, धर्माचा आणि चांगुलपणाचा झाला.त्यामुळे नवरात्र हे अन्यायावर न्यायाचा आणि आसुरी प्रवृत्तीवर सद्विचारांचा विजय दर्शविणारे पर्व मानले जाते.

घटस्थापनेत मातीचा घट, त्यातील पाणी, त्यावर ठेवलेला नारळ आणि घटाभोवती पेरले जाणारे धान्य यांना प्रतीकात्मक महत्त्व आहे. मातीचा घट म्हणजे धरतीमाता,पाणी म्हणजे जीवन, तर अंकुरणारे धान्य म्हणजे समृद्धी आणि सृष्टीतील नवसृजन. घटाभोवती उगवणारे हिरवेगार अंकुर माणसाला एक साधा पण अत्यंत महत्त्वाचा संदेश देतात.जीवनाला पोषक वातावरण मिळाले तर नव्या आशेचा अंकुर फुटतो. आज हा संदेश समजून घेण्याची गरज पूर्वीपेक्षा अधिक आहे.

विकासाच्या नावाखाली निसर्गाची होत असलेली लूट, बेसुमार वृक्षतोड, पाण्याचा वाढता तुटवडा, जमिनीची घटती सुपीकता, वाढतेजल, वायू ध्वनी, प्रकाश प्रदूषण आणि बदलते हवामान यामुळे मानवी जीवनासमोर गंभीर प्रश्न उभे ठाकले आहेत. आपण देवीसमोर घटस्थापना करतो; मात्र ज्या मातीपासून घट तयार होतो,त्याच मातीचे आरोग्य आपण जपत आहोत का? घटातील पाण्याला पवित्र मानतो;पण दैनंदिन जीवनात पाण्याची नासाडी थांबवतो का? हा आत्मपरीक्षणाचा प्रश्न आहे. आज अनेक गावांमध्ये पाण्यासाठी संघर्ष सुरू आहे.जो आगामी काळात अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.कुठे विहिरी कोरड्या पडत आहेत, कुठे शेतजमीन तहानलेली आहे, तर कुठे पावसाच्या अनियमिततेमुळे शेतीचे गणित कोलमडत आहे. अशा परिस्थितीत घटस्थापनेतील पाणी आपल्याला सांगते.की,पाणी हे केवळ साधन नाही,तर जीवनाचा श्वास आहे.

घटाभोवती उगवणारे धान्य शेतकऱ्याच्या श्रमांचीही आठवण करून देते. माती, पाणी, बीज आणि श्रम यांच्या संगमातून अन्न निर्माण होते. म्हणूनच नवरात्राच्या घटाकडे पाहताना शेतकरी,शेती आणि निसर्ग यांच्याविषयी कृतज्ञता जागी झाली पाहिजे.

घटस्थापनेचा आणखी एक महत्त्वाचा संदेश म्हणजे स्त्रीशक्तीचा सन्मान. ज्या समाजात देवीला शक्तीचे सर्वोच्च रूप मानले जाते, त्याच समाजात स्त्रीला सुरक्षित, सन्मानाचे आणि समानतेचे जीवन मिळणे ही खरी देवीपूजा आहे.



नवरात्राच्या काळात नऊ दिवस देवीसमोर आरती करण्यापेक्षा मुलीच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणे, तिच्या सुरक्षिततेची काळजी घेणे आणि स्त्रीचा सन्मान करणे हीच आदिशक्तीची खरी उपासना ठरेल. आजच्या धावपळीच्या, तणावपूर्ण आणि स्वार्थप्रधान जीवनात घटस्थापना मनालाही एक संदेश देते. मातीचा घट आपल्याला नम्रता,पाणी संवेदनशीलता, अंकुर आशा, तर ज्योत सद्विचारांचा प्रकाश शिकवते.

म्हणून या नवरात्रात देवीची पूजा करताना केवळ मंदिरातील घट प्रज्वलित करू नये; आपल्या मनातील माणुसकीचा घटही प्रज्वलित करूया. एक झाड लावूया, पाणी वाचवूया, माती जपूया, अन्नाची नासाडी टाळूया आणि स्त्रीचा सन्मान करूया. कन्या पूजन करण्यापेक्षा एखाद्या संस्थेने निराधार, असाह्य, कन्येला आधार देण्याच कार्य केलं तर उत्तमच. नवरात्रातील खरी घटस्थापना केवळ एका मातीच्या घटात होत नाही; ती आपल्या विचारांत, आपल्या कृतीत आणि आपल्या समाजजीवनात झाली,तरच आदिशक्तीची उपासना खऱ्या अर्थाने सार्थक होईल.

'माती जपली तर अंकुरेल जीवन,
पाणी जपले तर टिकेल जीवन;
आणि माणुसकी जपली तरच
सुंदर होईल हे जीवन!'

आज प्रतिकात्मक घटस्थापने सोबतच,शक्तीची उपासना, निसर्गाचे नाते आणि मानवी जीवनमूल्यांची पुनर्स्थापना होणे गरजेचे ठरते.

- ९१३०८३५४५८

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

दैनिक
# सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : बुधवार, ७ ऑक्टोबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com

# राहुल गांधींना घेतले ताब्यात

## दिल्ली आंदोलनात मोठा गोंधळ, प्रियंका गांधींनाही घेतले ताब्यात

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी आंदोलन करणाऱ्या काँग्रेस नेते राहुल गांधी आणि इतर नेत्यांना दिल्ली पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. गेल्या आठ तासांपासून दिल्लीच्या आकाशवाणी भवनमध्ये ठिय्या मांडलेल्या राहुल गांधी यांना पोलिसांनी अखेर ताब्यात घेतले आहे. राहुल यांच्यासोबत प्रियंका गांधी, केसी वेणुगोपाल यांच्यासह इतर प्रमुख नेत्यांनाही पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे.



मंगळवारी सकाळपासून इंडिया आघाडीच्या खासदारांनी दिल्लीमध्ये निवडणूक आयोगाच्या विरोधात भूमिका घेतली. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्यासह हे खासदार निवडणूक आयोगाच्या कार्यालयात जात असताना पोलिसांनी त्यांना अडवलं. पोलिसांनी बॅरिकेड्स लावल्यानंतर राहुल गांधी यांनी त्यावर चढत तिरंगा फडकावला होता. त्यानंतर पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले दरम्यान, दिल्ली पोलिसांच्या या व्हॅनला इंडिया आघाडीच्या खासदारांनी घेराव घातला आणि त्यातून राहुल गांधी आणि प्रियंका गांधी गनिमी काव्याने बाहेर पडले. त्यानंतर ते जवळच असलेल्या आकाशवाणी भवनमध्ये घुसले आणि त्या ठिकाणी ठिय्या मांडला. हे भवन निवडणूक आयोगाच्या कार्यालयापासून फक्त ३०० मीटर अंतरावर आहे.

काहीही करून आम्ही निवडणूक आयोगाच्या कार्यालयात जाणार, मुख्य निवडणूक आयुक्तांनी आपल्याला भेट द्यावी यासाठी राहुल गांधी आग्रही होते. पोलिसांनी त्यांना अडवल्यानंतर त्यांनी त्याच ठिकाणी ठिय्या मांडला. आम्हाला मुख्य निवडणूक आयुक्तांना भेटायचं आहे आणि काही प्रश्न विचारायचे आहेत या मतावर राहुल गांधी ठाम होते. तर तुम्हाला या ठिकाणी आंदोलन करता येणार नाही, या ठिकाणचं आंदोलन बंद करावे असं दिल्ली पोलिसांकडून सातत्याने सांगण्यात येत होतं.

राहुल गांधी आणि काँग्रेसच्या खासदारांनी या ठिकाणी तब्बल आठ तासांहून अधिक काळ ठिय्या मांडल्यानंतर दिल्ली पोलिसांनी अखेर त्यांना ताब्यात घेतलं. काहीही होवो, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना भेटल्याशिवाय परत जाणार नाही, असं सांगणाऱ्या राहुल गांधी यांनी आकाशवाणी भवनमध्येच रात्र घालवण्याची तयारी केली होती. मात्र त्या आधीच दिल्ली पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतलं.

दरम्यान, राहुल गांधी, प्रियंका गांधी यांच्यासह काँग्रेसच्या नेत्यांना ताब्यात घेतल्यानंतर दिल्ली पोलिसांनी या ठिकाणचे बॅरिकेड्स काढून टाकले आणि रस्ता मोकळा केला.

### इंडिया आघाडीच्या मागण्या काय आहेत?

- मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना हटवण्यासाठी संसदेत प्रस्ताव आणावा.
- एसआयआर प्रक्रियेतून मतदार यादीतून वगळण्यात आलेली नावे सार्वजनिक करावीत.
- नावे वगळण्यापूर्वी मतदाराला नोटीस आणि अपील करण्याची संधी मिळावी.
- ईव्हीएम ऐवजी मतपत्रिकेद्वारे निवडणुका घेण्यात याव्यात.

# अफगाणने चीनपर्यंत बांधला रस्ता

**वृत्तसंस्था, काबूल/नवी दिल्ली**

अफगाणिस्तानने ईशान्येकडील बदख्शान प्रांतातील वाखान कॉरिडॉरमार्गे चीनच्या शिनजियांगपर्यंत १२१ किलोमीटर लांबीचा रस्ता बांधला आहे. सुमारे ५५ लाख डॉलर खर्चून बांधलेल्या या रस्त्याचे उद्घाटनही झाले आहे. हा रस्ता अफगाणिस्तान आणि चीनमधील पहिला थेट भूप्रदेशीय मार्ग आहे.

तालिबान सरकारला या रस्त्यामार्फत आपली नैसर्गिक संसाधने आणि सोन्याच्या खाणी चीनच्या बाजारपेठेपर्यंत पोहोचवायच्या आहेत. त्यामुळे इतर देश आणि परदेशी कंपन्यांवरील आपले अवलंबित्व कमी करण्यास त्यांना मदत होऊ शकते. पाकिस्तानसोबतच्या तणावाच्या पार्श्वभूमीवर हा मार्ग धोरणात्मकदृष्ट्याही महत्त्वाचा मानला जात आहे. परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी अफगाणिस्तानचे परराष्ट्रमंत्री अमीर खान मुत्तकी यांची भेट घेताना वाखानमध्ये सुरू असलेल्या घडामोडींवर भारताचे लक्ष असल्याचे सांगितले होते.

**चीनसाठी खनिज-कनेक्टिव्हिटीचा मार्ग**

चीनसाठी वाखान कॉरिडॉर शिनजियांगच्या सुरक्षेच्या आणि व्यापाराच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. चीनने याच वर्षी या भागात एक नवीन प्रशासकीय कॉरिडॉरही तयार केला आहे. या मार्गामुळे चीनला अफगाणिस्तानातील सोने आणि इतर खनिजांपर्यंत सहज पोहोच मिळू शकते. तसेच इराण आणि मध्य पूर्वेतील बाजारपेठांपर्यंतही जमिनीमार्गे पोहोच मिळू शकते.

**भारतासाठी चिंतेचा विषय का?**

वाखान कॉरिडॉर भारताच्या दाव्यातील गिलगिट-बाल्टिस्तानजवळ आहे. अशा परिस्थितीत या भागातील चीनची वाढती उपस्थिती भारतासाठी चिंतेची बाब मानली जात आहे. हा प्रदेश लडाखच्या जवळही आहे. त्यामुळे भारताला उत्तरेकडील सीमेवर देखरेख आणि सुरक्षा वाढवावी लागू शकते.

**भारताला धोरणात्मक उपस्थिती वाढवावी लागेल**

संरक्षण तज्ज्ञ एनसी बिपिंद्रा यांच्या मते, वाखानमध्ये चीन आणि मध्य आशियाचे हितसंबंध जोडलेले आहेत. अफगाणिस्तान आणि पाकिस्तानमधील तणाव तसेच या भागातील चीनची वाढती उपस्थिती यामुळे वाखानचे महत्त्व वाढले आहे.

# न्यूझीलंड दौऱ्यासाठी २ टीम जाहीर, ध्रुव जुरेलकडे भारत 'अ' संघाची धुरा

**वृत्तसंस्था, मुंबई**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने न्यूझीलंड 'अ' संघाविरुद्धच्या तीन सामन्यांच्या अनधिकृत कसोटी मालिकेसाठी भारत 'अ' संघाची घोषणा केली आहे. १५ सदस्यीय या संघात अनेक अनुभवी आणि स्टार खेळाडूंचा समावेश करण्यात आला आहे. मात्र, सर्वाधिक चर्चेत असलेला निर्णय म्हणजे युवा यष्टीरक्षक-फलंदाज ध्रुव जुरेलकडे संघाच्या कर्णधारपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. विशेष म्हणजे या संघात ऋषभ पंत याचाही समावेश आहे. मात्र, पंतचा न्यूझीलंड दौऱ्यातील सहभाग त्याच्या वैद्यकीय तंदुरुस्तीच्या मंजुरीवर अवलंबून असणार आहे. त्यामुळे निवड समितीने जुरेलला नेतृत्वाची संधी दिली आहे. न्यूझीलंडविरुद्धच्या आगामी वरिष्ठ संघाच्या कसोटी मालिकेपूर्वी भारतीय खेळाडूंना तेथील परिस्थितीशी जुळवून घेता यावे, हा या दौऱ्यामागील महत्त्वाचा उद्देश आहे. त्यामुळे भारत 'अ' संघात अनेक कसोटी क्रिकेटपटूंचा समावेश करण्यात आला आहे. भारताचा कसोटी उपकर्णधार केएल राहुल, सलामीवीर यशस्वी जैस्वाल, देवदत्त पडिक्कल आणि साई सुदर्शन यांच्यावर फलंदाजीची भिस्त असेल. अष्टपैलू वॉशिंग्टन सुंदर आणि मानव सुथार फिरकीची जबाबदारी सांभाळतील.

# '२५ वर्षे राष्ट्रसेवेची, विकासाची आणि अभिमानाची' : एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र

**७ ऑक्टोबर २००१** रोजी नरेंद्र मोदी या निष्ठावान राष्ट्रसेवकाने गुजरातच्या मुख्यमंत्रिपदाची सूत्रे हाती घेतली आणि तेथून सुरू झालेला सेवेचा प्रवास पुढे २६ मे २०१४ रोजी भारताच्या पंतप्रधानपदापर्यंत पोहोचला. आज, २५ वर्षांच्या या प्रवासाकडे मागे वळून पाहताना तो केवळ एका नेत्याच्या राजकीय कारकिर्दीचा आलेख वाटत नाही; तो देशाच्या बदलत्या राजकीय, सामाजिक आणि विकासाच्या प्रवासाशी जोडलेला अध्याय ठरतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा हा २५ वर्षांचा हा 'सेवा, संकल्प आणि समर्पण'चा प्रवास आहे. १४० कोटी भारतीयांच्या वाढत्या आत्मविश्वासाचा हा प्रवास आहे. या निमित्ताने महाराष्ट्रातील १३ कोटी जनता आणि शिवसेनेच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मनःपूर्वक शुभेच्छा.

वडनगरच्या मातीतील हा आवाज आज जागतिक व्यासपीठावर भारताच्या भूमिकेचा प्रभावी स्वर आहे. गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून ७ ऑक्टोबर २००१ ते मे २०१४ या काळात मोदी यांनी राज्याच्या विकासासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. विनाशकारी भूज भूकंपाच्या पार्श्वभूमीवरच त्यांनी मुख्यमंत्रिपदाची जबाबदारी स्वीकारली. भूज आणि कच्छ परिसरातील पुनर्वसन, पुनर्बांधणी आणि नवनिमार्णाच्या कामांना वेग देण्यात आला. २००३ मध्ये 'व्हायब्रंट गुजरात ग्लोबल समिट' ची सुरुवात केली. या परिषदेच्या माध्यमातून जगभरातील मोठ्या कंपन्या आणि उद्योगपतींना गुजरातमध्ये गुंतवणूक करण्यासाठी आकर्षित करण्यात आले. हे गुजरात मॉडेल देशवासियांना भावले. कारण, त्याचवेळी, देशात विकास या नावाखाली दिलेली पोकळ आश्वासने, भ्रष्टाचार आणि गरिबी हटवण्याच्या नावाखाली श्रीमंतांच्या तिजोऱ्या भरण्याच्या प्रयत्नांविरोधात असंतोष वाढत होता. त्या असंतोषाच्या ठिणग्यांचे राजकीय ऊर्जेत रूपांतर करण्याचे काम मोदीजींनी केले.

२०१४ पूर्वीचा भारत आणि २०१४ नंतरचा भारत या दोघांमध्ये मोठा फरक दिसून येतो. जेव्हा एका देशाचा पंतप्रधान बदलतो, तेव्हा केवळ सरकार बदलत नाही, देशाचे भविष्य बदलते आणि तोच करिष्मा २०१४ नंतर घडला. नरेंद्र मोदी यांनी २६ मे २०१४ रोजी भारताच्या पंतप्रधानपदाची शपथ घेतली. त्यानंतर केंद्र सरकारच्या धोरणांमध्ये विकास, पायाभूत सुविधा, डिजिटल तंत्रज्ञान, सामाजिक कल्याण आणि राष्ट्रीय सुरक्षेला विशेष महत्त्व देण्यात आले.

जनधन योजनेच्या माध्यमातून बँकिंग व्यवस्थेशी मोठ्या संख्येने नागरिकांना जोडण्याचा प्रयत्न झाला. थेट लाभ हस्तांतरण आणि सरकारी सेवांच्या डिजिटलीकरणाला वेग मिळाला. 'स्वच्छ भारत मिशन'च्या माध्यमातून स्वच्छता आणि शौचालयनिर्मितीवर भर देण्यात आला. पंतप्रधान आवास योजना, उज्ज्वला योजना, जलजीवन मिशन आणि पीएम-किसान यांसारख्या योजनांमधून घर, स्वयंपाकाचे स्वच्छ इंधन, नळाद्वारे पाणी आणि शेतकऱ्यांना थेट आर्थिक मदत अशा विविध क्षेत्रांत सरकारने ऐतिहासिक काम केले.

डिजिटल इंडिया आणि यूपीआयच्या विस्तारामुळे डिजिटल व्यवहारांच्या क्षेत्रात मोठा बदल झाला. महामार्ग, रेल्वे, विमानतळ आणि इतर पायाभूत सुविधांच्या विस्ताराला गती देण्यात आली. 'मेक इन इंडिया', 'स्टार्टअप इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' यांसारख्या उपक्रमांमधून देशांतर्गत उत्पादन, गुंतवणूक आणि उद्योजकतेला चालना दिली जात आहे. नवीन शैक्षणिक धोरण, नवीन फौजदारी कायदे आणि तिहेरी तलाकविरोधी कायदा यांसारखे निर्णयही मोदी सरकारच्या कार्यकाळात झाले. काश्मिरचे ३७० कलम हटवण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्याचे धाडसही मोदी सरकारने दाखवले. गेल्या १२ वर्षांतील अशा असंख्य निर्णयांमुळे भारतीय राजकारण, अर्थकारण, प्रशासन आणि सामाजिक धोरणांच्या दिशेवर व्यापक आणि अत्यंत सकारात्मक परिणाम झाला.

विकासाच्या अजेंड्यासोबत सांस्कृतिक वारशालाही केंद्रस्थानी आणण्याचा प्रयत्न या काळात झाला. अयोध्येतील श्रीराम मंदिराची निर्मिती आणि रामलल्लांच्या प्राणप्रतिष्ठेचा देदीप्यमान सोहळा, काशी विश्वनाथ धामचा विकास, महाकाल लोक तसेच विविध तीर्थक्षेत्रांच्या विकासातून धार्मिक पर्यटन आणि सांस्कृतिक वारसा अधोरेखित करण्यात आला. 'विकास के साथ विरासत' ही संकल्पना मांडत आधुनिक पायाभूत सुविधांसोबत भारताच्या सांस्कृतिक वारशाचे संवर्धन करण्यावर भर देण्यात आला.

महिला सक्षमीकरण हा केंद्र सरकारच्या विकासाचा आणखी एक महत्त्वाचा भाग. 'बेटी बचाओ, बेटी पढाओ'पासून 'लखपती दीदी'पर्यंत, उज्ज्वला, मुद्रा आणि स्वयं-सहायता बचतगटांपर्यंत महिलांचा आर्थिक आणि सामाजिक सहभाग वाढवण्याच्या विविध योजना राबवण्यात आल्या.



महाराष्ट्रातही याच दिशेने महायुती सरकारने महिला सक्षमीकरणासाठी विविध निर्णय घेतले आहेत. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना असो किंवा मुलींना उच्च शिक्षण देण्याचा निर्णय... महिला सक्षम झाली तर कुटुंब सक्षम होते, कुटुंब सक्षम झाले तर समाज सक्षम होतो आणि राष्ट्राची शक्ती वाढते.

राष्ट्रीय सुरक्षा आणि परराष्ट्र धोरणाच्या क्षेत्रातही मोदी सरकारच्या काळात अनेक महत्त्वपूर्ण घडामोडी झाल्या. सीमापार दहशतवादाच्या प्रश्नावर भारताने अधिक कठोर भूमिका घेतली. ब्रिक्स, ग्लोबल साऊथ, हवामान बदल, डिजिटल तंत्रज्ञान, योग आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य यांसारख्या विषयांवर भारताने आपली एक वेगळी भूमिका मांडली आहे. आज भारताचा आवाज जगातील मोठ्या मंचांवर ठामपणे ऐकला जातो. भारताच्या वाढत्या आर्थिक, सामरिक आणि राजनैतिक क्षमतेला आज महत्त्व प्राप्त झाले आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताची नवी आणि सक्षम ओळख निर्माण करण्याचे श्रेय मोदीजींना आहे. त्यामुळेच जवळपास ३६ राष्ट्रांनी आपल्या सर्वोच्च नागरी पुरस्कारांनी मोदीजींना गौरविले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारचा गेल्या १२ वर्षांचा कालखंड महाराष्ट्राच्या पायाभूत आणि आर्थिक विकासासाठीही महत्त्वाचा ठरला आहे. केंद्राकडून महाराष्ट्राला मिळालेले साहाय्य केवळ निधीपुरते मर्यादित न राहता अनेक दीर्घकालीन प्रकल्पांना गती देणारे ठरले आहे.

२०१४ पूर्वीच्या दहा वर्षांत म्हणजेच २००४ ते २०१४ या काळात महाराष्ट्राच्या विकासकामांसाठी दोन लाख कोटी केंद्र सरकारने दिले होते. २०१४ ते २०२४ या काळात महाराष्ट्राला १२ लाख कोटींचा निधी मिळाला. रेल्वे क्षेत्रातील तरतुदीतही मोठी वाढ झाली आहे. २००९ ते २०१४ या काळातील सरासरी वार्षिक तरतूद १,१७१ कोटी रुपये होती, तर २०२६-२७ मध्ये ती २३,९२६ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. आजच्या घडीला राज्यात सुमारे दीड लाख कोटी रुपयांचे पायाभूत सुविधा प्रकल्प सुरू असून 'अमृत भारत स्थानक योजने'अंतर्गत १२८ रेल्वे स्थानकांच्या पुनर्विकासाचे काम सुरू आहे. अटल सेतू, समृद्धी महामार्ग, मुंबई कोस्टल रोड, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन आणि कोकण-पालघरच्या औद्योगिक विकासासाठी महत्त्वाचे ठरणारे ७६ हजार कोटी रुपयांचे वाढवण बंदर अशा प्रकल्प महाराष्ट्रासाठी सर्वार्थाने 'गेमचेंजर' प्रकल्प आहेत.

कल्याणकारी योजनांच्या माध्यमातूनही महाराष्ट्रातील नागरिकांना केंद्र सरकारच्या योजनांचा लाभ मिळत आहे. पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत मे २०२६ पर्यंत १८ लाख गरीब कुटुंबांची घरे पूर्ण झाली. जल जीवन मिशनच्या माध्यमातून ग्रामीण भागातील नळाद्वारे पाणीपुरवठ्याचे प्रमाण ३३ टक्क्यांवरून ८९ टक्क्यांपर्यंत वाढले आहे. पीएम-किसान योजनेतून राज्यातील पात्र शेतकऱ्यांना थेट आर्थिक मदत दिली जात आहे.

महाराष्ट्राच्या विकासाबरोबरच राज्याच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक अस्मितेलाही केंद्र सरकारच्या निर्णयांमधून महत्त्व मिळाले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या ऐतिहासिक किल्ल्यांचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पंचतीर्थांचा विकास आणि मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा निर्णय हे महाराष्ट्राच्या दृष्टीने महत्त्वाचे टप्पे ठरले आहेत.

हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी गुजरात आणि नरेंद्र मोदी यांच्या संदर्भात हिंदुत्वाच्या राजकारणाबाबत आपली भूमिका अनेकदा स्पष्टपणे मांडली होती. महाराष्ट्र आणि गुजरातच्या राजकीय प्रवासात हिंदुत्वाच्या विचाराचा हा संवाद जुना आहे. त्यामुळे महाराष्ट्र आणि नरेंद्र मोदीजी यांच्यातील राजकीय-सामाजिक संबंधांचा हा धागाही महत्त्वाचा ठरतो.

आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा व्यक्तिगत स्नेह मला आणि माझ्या संपूर्ण कुटुंबाला लाभला, हे माझे परमभाग्य आहे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या निधनाने आयुष्यात निर्माण झालेली पोकळी मोदीजींच्या आपुलकीने मला मोठे बळ दिले. प्रत्येक भेटीत ते 'कैसे हैं एकनाथजी?' असे विचारतात आणि खांद्यावर हात ठेवतात. त्या क्षणी एक नवा विश्वास निर्माण होतो, नवी उमेद मिळते आणि महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी आणखी जोमाने काम करण्याचे बळ मिळते. हा स्नेहाचा ऋणानुबंध माझ्यासाठी कायमच विशेष राहील.

गेली २५ वर्षे सतत, अथक आणि अविश्रांत काम करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवभारताच्या निर्मितीचा ध्यास घेतला आहे. विरोधकांची अत्यंत जहरी अशी द्वेषमूलक टीका, चारित्र्यहननाचे प्रयत्न, ध्रुवीकरणाचे निराधार आरोप, निंदानालस्तीचे शाब्दिक बाण असा चहूबाजूंनी मारा सुरू असतानाही मोदीजींनी कधी लक्ष्यावरून आपली नजर ढळू दिली नाही. गेल्या २५ वर्षांत नरेंद्र मोदी यांच्या जबाबदाऱ्या बदलल्या, पदे बदलली; मात्र राष्ट्रसेवेचा संकल्प आणि निर्धार तसूभरही कमी झालेला नाही. २५ वर्षांचा हा प्रवास एका व्यक्तीच्या राजकीय कारकिदीर्चा केवळ कालावधी नाही. तो बदलत्या भारताच्या राजकीय आणि विकासाच्या प्रवासातील एक महत्त्वाचा अध्याय आहे. गुजरातपासून दिल्लीपर्यंत आणि तेथून विकसित भारत २०४७च्या संकल्पापर्यंत पोहोचलेला हा प्रवास आता पुढील टप्प्याकडे पाहत आहे.

आता पुढील मोठे लक्ष्य आहे, 'विकसित भारत २०४७'. आर्थिकदृष्ट्या सक्षम, तांत्रिकदृष्ट्या प्रगत, आत्मनिर्भर आणि सुरक्षित भारत उभारण्याचे हे ध्येय आहे. गरीबांना संधी देणारा, तरुणांच्या स्वप्नांना पंख देणारा, महिलांना समान संधी आणि नेतृत्व देणारा आणि आपल्या संस्कृतीचा अभिमान बाळगणारा भारत घडवण्याचे उद्दिष्ट या संकल्पनेत मांडले गेले आहे.

अलीकडेच प्रसंगावधान राखून १७४ विमानप्रवाशांचे प्राण वाचवणारे कॅप्टन स्मित मच्छार यांनी पंतप्रधानांशी संवाद साधताना त्यांच्याकडून प्रेरणा घेतल्याचे सांगितले. अशा प्रसंगांतून नेतृत्वाचा मोदीजींचा व्यक्तिगत प्रभाव आणि जनमानसातील त्याची प्रतिमा अधोरेखित होताना दिसते.

लोकप्रियतेचे आणि कार्यकाळाचे आकडे अनेक नेत्यांच्या नावावर नोंदवले जातात. मात्र नरेंद्र मोदी यांच्या बाबतीत मोजली जाते ती केवळ दिवसांची संख्या नाही, तर त्यांच्या कार्यकाळात घेतलेल्या निर्णयांची व्याप्ती आणि त्यांनी उभा केलेला राजकीय प्रभाव. मोदीजींच्या आगामी वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा. ईश्वर त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि राष्ट्रसेवेसाठी अफाट शक्ती देवो, हीच प्रार्थना.

# दुष्काळात शेतीला संजीवनी, प्रत्येक जिल्ह्याला नवीन १ हजार रोहित्र मंजूर

## राज्य शासनाकडून अभूतपूर्व निर्णय, बळीराजाला दिलासा, विशेष निधीद्वारे शेतीसाठी अखंडित वीजपुरवठा होणार

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
राज्यात निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीमध्ये बळीराजाला मोठा दिलासा देणारा अभूतपूर्व निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. वितरण रोहित्र, 'स्पेशल डिझाईन ट्रान्सफॉर्मर' आणि 'कॅपॅसिटर बँक' खरेदी करण्यासाठी जिल्हा नियोजन व विकास समिती (डीपीडीसी) अंतर्गत प्रत्येक जिल्ह्यासाठी तब्बल २० कोटी रुपयांपर्यंतचा विशेष निधी उपलब्ध करून देण्याच्या महत्त्वाकांक्षी प्रस्तावाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य शासनाने मंगळवारी (दि. ६) मंजुरी दिली.
या निर्णयामुळे राज्यातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी आणि ग्रामीण भागात योग्य दाबाने सुरळीत वीजपुरवठा करण्यासाठी वीज वितरण यंत्रणेच्या सक्षमीकरणाचे कामे युद्धपातळीवर सुरु होणार आहेत.
यंदाच्या कमी पर्जन्यमानामुळे महाराष्ट्र शासनाने राज्यातील ३५८ तालुक्यांपैकी तब्बल २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती जाहीर केली आहे. महावितरणकडून राज्यात सुमारे ४७ लाखांवर कृषी ग्राहकांना विविध क्षमतेच्या वितरण रोहित्रांद्वारे वीजपुरवठा केला जात आहे. दुष्काळी परिस्थितीत हा वीजपुरवठा सुरळीत आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम राहणे आवश्यक असल्याने राज्य शासनाने प्रत्येक जिल्ह्यात वीज यंत्रणा सक्षम करण्याचे आदेश दिले आहेत.
राज्य शासनाने मंजूर केलेल्या विशेष निधीच्या माध्यमातून तीन महत्वाचे कामे तातडीने करण्यात येणार आहेत. यामध्ये आवश्यकतेनुसार नवीन वितरण रोहित्रांची (ट्रान्सफॉर्मर्स) खरेदी केली जाईल. त्याद्वारे अतिभारित (ओव्हरलोड) किंवा नादुरुस्त रोहित्र बदलून सिंचनातील अडथळे दूर करण्यात येतील. यासोबतच कृषी वीजवाहिनीवर असलेल्या घरगुती वीज ग्राहकांना आणि शेतातील घरांना २४ तास सुरळीत वीजपुरवठा करण्यासाठी आवश्यकतेनुसार सिंगल फेज आणि थ्री-फेजचे नवीन स्पेशल डिझाईन ट्रान्सफॉर्मर (एसडीटी) खरेदी करून ते बसवले जाणार आहेत. तसेच लांब अंतराच्या वीजवाहिन्यांवर कमी दाबाने (लो-व्होल्टेज) वीजपुरवठा होण्याच्या समस्येवर कायमस्वरूपी मात करून योग्य दाबाने व दर्जेदार वीजपुरवठा करण्यासाठी आवश्यकतेनुसार नवीन कपॅसिटर बँकेची खरेदी करण्यात येणार आहेत.
वीजयंत्रणेच्या या सर्व कामांची युद्धपातळीवर अंमलबजावणी व्हावी यासाठी महावितरणच्या संबंधित अधीक्षक अभियंता कार्यालयामार्फत सर्व तांत्रिक बाबींची तात्काळ तपासणी केली जाणार आहे. वीजयंत्रणेच्या स्थानिक गरजांनुसार आवश्यक अंदाजपत्रके तयार करून ती तत्परतेने संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करण्याचे निर्देश राज्य शासनाने दिले आहेत.
दुष्काळसदृश परिस्थितीत शेतकऱ्यांचे नुकसान टळावे आणि पिकांना वेळेवर पाणी देता यावे यासाठी या अंदाजपत्रकांना जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत तातडीने प्रशासकीय मान्यता प्रदान केली जाईल. या कामांच्या मान्यतेचे संपूर्ण अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. तसेच या योजनेअंतर्गत मंजूर व वितरित निधीच्या विनियोगाचा अहवाल महावितरणच्या अधीक्षक अभियंता कार्यालयाकडून विहित कालावधीत जिल्हाधिकाऱ्यांना सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. राज्य शासनाच्या या धोरणात्मक व धडाडीच्या निर्णयामुळे दुष्काळाच्या सावटाखाली असलेल्या राज्यातील लाखो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. तसेच ग्रामीण भागातील महावितरणच्या वीजयंत्रणेला देखील नवी ताकद मिळणार आहे.

## खा. प्रतिभा धानोरकर यांच्या सूचनेनंतर रेल्वे आणि नगर परिषद प्रशासनाकडून संयुक्त पाहणी

### गोल पुलियामधून होणाऱ्या वाहतुकीची समस्या लवकरच सोडवली जाईल



**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर-धनंजय पांढरे**
नागपूर-काझीपेठ तिसऱ्या आणि चौथ्या मार्गाच्या कामामुळे बल्लारपूर शहरातील बस्ती येथील 'गोल पुलिया'चा विस्तार करण्यात आला होता. मात्र, या बांधकामामुळे गेल्या दोन वर्षांपासून स्थानिक नागरिकांना व वाहनधारकांना ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. नागरिकांची ही समस्या लक्षात घेऊन नगर परिषद प्रशासनाने स्थानिक खासदार प्रतिभा धानोरकर यांना परिस्थितीची माहिती देत प्रत्यक्ष भेटीची विनंती केली होती. त्यानुसार २८ सप्टेंबर रोजी खासदार प्रतिभा धानोरकर यांनी गोल पुलिया परिसराला भेट देऊन पाहणी केली आणि मध्य रेल्वेच्या नागपूर विभागीय व्यवस्थापकांशी संपर्क साधून हा प्रश्न तात्काळ सोडवण्याचे निर्देश दिले.
खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या सूचनेची तातडीने दखल घेत मंगळवारी दुपारी मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाचे एक विशेष पथक आणि स्थानिक प्रशासकीय अधिकाऱ्यांनी गोल पुलिया परिसरात संयुक्त पाहणी केली. या पाहणी दरम्यान रेल्वेचे कार्यकारी अभियंता दिलीप सेलूकर, उपनगराध्यक्ष देवेंद्र आर्य, बांधकाम सभापती अब्दुल करीम शेख, पाणीपुरवठा सभापती इस्माईल ढकवाला, ज्येष्ठ नगरसेवक भास्कर माकोडे, बांधकाम विभागाचे मयूर दहीकर, कृष्णा गुलहाने, प्रणय वाटेकर, कंत्राटदाराचे प्रतिनिधी संदीप चौहान आणि खासदार प्रतिनिधी शेगावकर यांच्यासह अन्य लोकप्रतिनिधी व नागरिक उपस्थित होते.
पाहणीदरम्यान रेल्वे व नगर परिषदेच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष परिस्थितीचा आढावा घेतला आणि स्थानिक नागरिकांशी थेट संवाद साधला. आगामी नवरात्री आणि दिवाळी सणांच्या काळात नागरिकांची गैरसोय होऊ नये, हे लक्षात घेऊन गोल पुलाचे सुधारित काम दिवाळी सण संपल्यानंतर तात्काळ सुरू केले जाईल, असे आश्वासन रेल्वे पथकातील अधिकाऱ्यांनी दिले. तसेच या समस्येवर तांत्रिक व प्रशासकीय बाबी तपासून लवकरात लवकर कायमस्वरूपी आणि योग्य तोडगा काढला जाईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.
खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे व दिलेल्या निर्देशांमुळे रेल्वे प्रशासन आणि नगर परिषदेने तात्काळ सकारात्मक पावले उचलल्याबद्दल स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. खासदार महोदयांच्या पुढाकारामुळे गोल पुलिया परिसरातील वाहतुकीची आणि रस्त्याची अडचण लवकरच दूर होणार असल्याचे संकेत मिळाल्याने बल्लारपूरवासीयांना मोठा दिलासा मिळाला आहे.

## पूर्ती पब्लिक स्कूलच्या विद्यार्थिनींचे मैदानी क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय यश

### विद्या टेकामची लांब उडीत बाजी, वांशिका सोनवानेची १०० व २०० मीटर धावण्यात अव्वल कामगिरी

**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा**
पूर्ती पब्लिक स्कूलच्या विद्यार्थिनींनी मैदानी क्रीडा स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. कु. विद्या विनोद टेकाम हिने लांब उडी स्पर्धेत प्रथम क्रमांक, तर कु. वांशिका लखन सोनवाने हिने १०० मीटर व २०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले.



या दमदार कामगिरीच्या जोरावर दोन्ही विद्यार्थिनींची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्यांच्या या यशामुळे शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीत आणखी भर पडली असून परिसरातून त्यांचे कौतुक होत आहे.
विद्यार्थिनींच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेच्या संस्थाध्यक्ष शालिनीताई बडोले, संस्था सचिव डॉ. राजेंद्र बडोले व प्राचार्य प्रशांत बंसोड यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडा शिक्षक अजय सयाम, ओमप्रकाश नेवारे, लोकेश चन्ने, रोहिणी तिरपुडे व रिंपी शर्मा यांच्या हस्ते दोन्ही विद्यार्थिनींचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले. तसेच आगामी जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या.
विद्यार्थिनींच्या या यशाबद्दल शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालकांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील क्रीडा वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. विद्यार्थिनींच्या मेहनतीला योग्य मार्गदर्शन आणि प्रोत्साहन मिळाल्यास त्या जिल्हास्तरावरही उत्कृष्ट कामगिरी करतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## राष्ट्रीय ओबीसी महासंघाची शहर कार्यकारिणी बैठक, दिल्लीतील आंदोलनावर सखोल चर्चा



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या शहर कार्यकारिणीची महत्त्वपूर्ण बैठक नुकतीच रवीभवन, नागपूर येथे पार पडली. या बैठकीत आगामी जातीय जनगणनेत इतर मागासवर्गीयांसाठी स्वतंत्र कॉलम समाविष्ट करण्याच्या मागणीसह विविध महत्त्वाच्या विषयांवर सखोल विचारमंथन करण्यात आले.
आगामी जातीय जनगणनेमध्ये ओबीसी समाजासाठी स्वतंत्र कॉलम असलाच पाहिजे, असा ठाम सूर या बैठकीत उमटला.
दिल्लीतील रामलीला मैदानावर होणाऱ्या राष्ट्रीय आंदोलनात नागपूर शहरातून मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे नियोजन करण्यात आले.
महासंघाद्वारे आतापर्यंत पार पडलेल्या कार्याचा आढावा घेण्यात आला तसेच पुढील काळात छेडण्यात येणाऱ्या आंदोलनांची दिशा ठरवण्यात आली.
या बैठकीस महासंघाचे अध्यक्ष परमेश्वर राऊत, नगरसेवक शकील पटेल, गुणेश्वर आरीकर, घनश्याम मांगे, किशोर शिरपूरकर, रामभाऊ कावडकर, पुरुषोत्तम मुरमे, एकनाथ काळमेघ, सुरेश कोंगे, सुरेश जिचकार, ज्ञानेश्वर ठाकरे, त्रिलोचन व्यवहारे, प्रतीक व्यवहारे, प्रशांत तिडके, हेमंत गावंडे, डॉ. सुधाकर तायवाडे, विनोद इंगोले, माजी नगरसेवक नाना झोडे, वृंदा ठाकरे, अनिता ठेंगरे, नंदा देशमुख, अविनाश घागरे, बाबा ढोबळे, चंद्रकांत हिंग, उदय देशमुख, गणेश गाडेकर, दौलत शास्त्री, मंगेश कामोने, संजय मांगे, केशव शास्त्री, राहुल खैरकर, राजेश काकडे यांच्यासह राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या सर्व विंगचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अवघ्या पाचव्या वर्षी अरहंत नितेश थुलची विश्वविक्रमाकडे झेप

### यंगेस्ट मेमरी जिनियस म्हणून नोंद, नोबल बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्समध्ये ब्रेक वर्ल्ड रेकॉर्ड म्हणून नोंदणी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
महाराष्ट्रातील अवघ्या पाच वर्षांच्या अरहंत नितेश थुल या चिमुकल्या बुद्धिमान बालकाने आपल्या असामान्य स्मरणशक्ती, मानसिक गणितातील कौशल्य, आत्मविश्वास आणि विविधांगी प्रतिभेच्या जोरावर उल्लेखनीय कामगिरी नोंदविली आहे. अरहंतच्या या प्रतिभेची दखल नोबल बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्सने घेतली असून, त्याची नोंद 'यंगेस्ट मेमरी जिनियस - अ मल्टिटॅलेंटेड वंडर किड' म्हणून करण्यात आली आहे. त्याची ही कामगिरी ब्रेक वर्ल्ड रेकॉर्ड म्हणून नोंदविण्यात आल्याचे प्रमाणपत्रात नमूद करण्यात आले आहे. अरहंत नितेश थुल याने अत्यंत लहान वयात स्मरणशक्ती, मानसिक गणित, सार्वजनिक वक्तृत्व, संवादकौशल्य, सामान्य ज्ञान तसेच राष्ट्रीय आणि सामाजिक विषयांबाबतचे ज्ञान या विविध क्षेत्रांत उल्लेखनीय क्षमता प्रदर्शित केली आहे. त्याच्या शैक्षणिक तसेच




सहशालेय उपक्रमांमधील कामगिरीतून त्याची विलक्षण आकलनशक्ती, शिकण्याची क्षमता, एकाग्रता आणि आत्मविश्वास प्रकर्षाने दिसून येतो.
अवघ्या पाचव्या वर्षी अरहंतने मिळविलेली ही विशेष ओळख त्याच्या बहुआयामी प्रतिभेचे प्रतीक मानली जात आहे. लहान वयातच कठीण गणिती उदाहरणे मानसिक पद्धतीने सोडविणे, विविध माहिती लक्षात ठेवणे तसेच आत्मविश्वासाने आपले ज्ञान मांडणे यामुळे अरहंतने विशेष लक्ष वेधून घेतले आहे.
त्याच्या या कौशल्यांमागे सातत्यपूर्ण सराव, शिकण्याची आवड आणि कुटुंबीयांचे मार्गदर्शनाचा महत्त्वाचा मोलाचा वाटा आहे. नोबल बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्सच्या प्रमाणपत्रा नुसार अरहंत नितेश थुल याची ही कामगिरी NWR Record No. IN24103565 या क्रमांकाने नोंदविण्यात आली आहे. प्रमाणपत्रावर ६ ऑक्टोबर २०२६ ही तारीख नमूद असून, संबंधित नोंद 'Keepers of the Noble World Records' या संस्थेअंतर्गत करण्यात आली आहे. अरहंतच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे महाराष्ट्राच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.
एवढ्या कमी वयात विविध क्षेत्रांमध्ये आपली बुद्धिमत्ता आणि कौशल्य सिद्ध करणारा अरहंत हा इतर बालकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. त्याची मेहनत, जिज्ञासा, आत्मविश्वास आणि शिकण्याची वृत्ती यामुळे भविष्यात तो आणखी मोठ्या यशाची शिखरे गाठेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. लहान वय, मोठी कामगिरी आणि असामान्य बुद्धिमत्ता यांचा सुरेख संगम असलेल्या अरहंत नितेश थुलच्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत असून, त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. बालवयातच मिळालेली ही जागतिक स्तरावरील नोंद अरहंतच्या पुढील वाटचालीसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे.

**थोडक्यात**

## "स्वरमेघ आर्ट फाउंडेशन" आणि "स्वप्नगंध" सांगितिक महफिल "बॉलीवूड हिट्स" ९ ऑक्टोबरला

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
भारतीय चित्रपट सृष्टीतील अजरामर आणि सदाबहार गीतांना उजाळा देणारी एक भव्य सांगीतिक मैफल 'बॉलीवूड हिट्स'चे आयोजन स्वरमेघ आर्ट फाउंडेशन आणि स्वप्नगंध यांच्या वतीने करण्यात आले आहे. ही सांगीतिक संध्या शुक्रवार, ९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६.३० वाजता कविवर्य सुरेश भट सभागृह येथे रंगणार आहे. बॉलीवूडच्या सुवर्णकाळापासून आजवर रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या लोकप्रिय गीतांची सुरेल सफर या कार्यक्रमातून रसिकांना अनुभवता येणार आहे. जुन्या आठवणींना उजाळा देतानाच विविध भावछटांनी नटलेल्या सदाबहार गीतांची मेजवानी रसिकांना मिळणार आहे.
या कार्यक्रमात स्मिता टोणगावकर, निकेता जोशी, माया सायखेडकर, प्रीती कुलकर्णी, प्रकाश देशपांडे, अजय देशपांडे आणि समीर उपाध्ये हे गायक कलाकार आपल्या दमदार आणि सुरेल सादरीकरणाने रसिकांना मंत्रमुग्ध करणार आहेत. कार्यक्रमाचे संगीत संयोजन परिमल जोशी यांचे आहे. संगीत प्रेमींसाठी ही अविस्मरणीय सांगीतिक संध्याकाळ ठरणार असून, नागपूरकर रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून बॉलीवूड हिट्सचा आनंद घ्यावा, असे आवाहन स्वरमेघ आर्ट फाउंडेशनचे अध्यक्ष मनीष उपाध्ये यांच्यावतीने करण्यात आले आहे. अशी माहिती दिनेश टेकाडे यांनी प्रसिद्धी पत्रकात दिली.

## डॉ. शिल्पा डी. टाले यांना 'निसर्गोपचार गौरवाने सन्मान'



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर / पारशिवनी**
येथील सुप्रसिद्ध निसर्गोपचार तज्ञ डॉ. शिल्पा डी. टाले यांना निसर्गोपचार क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल प्रतिष्ठेचा 'निसर्गोपचार गौरव सन्मान २०२६' प्रदान करण्यात आला. आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन, ए.जी.एम.ए. व योगा निसर्गोपचार चिकित्सक असोसिएशन यांच्या वतीने रविवार, ४ ऑक्टोबर २०२६ रोजी बुलडाणा येथील भातृमंडळ हॉलमध्ये आयोजित कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते डॉ. शिल्पा डी. टाले यांचा सन्मान करण्यात आला. निसर्गोपचार क्षेत्रात कार्यरत असलेल्या तज्ञांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन हा सन्मान प्रदान करण्यात आला. या सोहळ्यास महाराष्ट्रातील शेकडो निसर्गोपचार तज्ञ मोठ्या संख्येने उपस्थित होते.
कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून बुलडाणा मतदारसंघातील आमदार मा. संजयभाऊ गायकवाड, बुलडाणा नगरपालिका नगराध्यक्षा पूजाताई गायकवाड, डॉ. सचिन सुपे, डॉ. त्रिदीप गुहा, डॉ. प्रशांत कपाले, एम.जी.एम. विद्यापीठाचे योगा विभाग प्रमुख गंगाप्रसाद खरात उपस्थित होते. मंचावर आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशनचे व्हाईस चेअरमन नितीनराजे पाटील, आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. बाबुराव कानडे, सौ. दिशा चव्हाण, विजय नवल पाटील, विनोद ढोबळे, रावसाहेब घोडेगाव, रामेश्वर शिंदे, श्रीकांत अंजुटगी, भानुदास परबत, अशोक देवकर, स्मिता खारकर, राहुल देशमुख, आशिष सूर्यवंशी यांच्यासह आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशनचे पदाधिकारी उपस्थित होते. डॉ. शिल्पा डी. टाले यांना मिळालेल्या या सन्मानाबद्दल निसर्गोपचार क्षेत्रातून तसेच विविध स्तरांतून त्यांचे कौतुक होत असून, त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## ठाणेदार मस्कर यांची तडकाफडकी बदली!

### अवघ्या सहा महिन्यांत 'मस्कर पर्व' संपुष्टात; अजित देवरे यांच्याकडे भिवापूर ठाण्याची सूत्रे

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**
भिवापूर पोलीस ठाण्याचे वादग्रस्त ठरलेले सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र मस्कर यांची अखेर तडकाफडकी बदली करण्यात आली आहे. पोलीस अधीक्षकांच्या आदेशानुसार त्यांची नागपूर येथील पोलीस नियंत्रण कक्षात नियुक्ती करण्यात आली असून, त्यांच्या जागी सहाय्यक पोलीस निरीक्षक अजितसिंग रामदास देवरे यांच्याकडे भिवापूर पोलीस ठाण्याच्या प्रभारी ठाणेदारपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.



पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार यांनी काढलेल्या आदेशानुसार ही प्रशासकीय बदली असून मस्कर यांची नियंत्रण कक्षात, तर बुटीबोरी पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले एपीआय अजित देवरे यांची प्रभारी पोलीस निरीक्षक, म्हणून भिवापूरला नियुक्ती करण्यात आली आहे. मस्कर यांनी भिवापूर पोलीस ठाण्याचा कारभार स्वीकारल्यापासून अवघ्या सहा महिन्यांच्या काळात विविध कारवायांमुळे ते चर्चेत राहिले. त्यांच्या काही कारवायांबाबत नागरिकांमध्ये नाराजीचे सूरही उमटले होते. याच दरम्यान काही नागरिकांनी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडे भिवापूरला पोलीस निरीक्षकांची नियुक्ती करण्याची मागणीही केली होती.
सहा महिन्यांचा मस्कर पर्व संपला असून, देवरे यांच्या नव्या कार्यकाळात भिवापूर पोलिसांची कार्यपद्धती आणि कारवाईची दिशा काय राहणार, याकडे आता तालुक्याचे लक्ष लागले आहे. मस्कर यांच्या बदली आदेशात 'प्रशासकीय कारणास्तव' बदली करण्यात येत असल्याचे नमूद असले तरी एका 'वेगळ्याच' कारणामुळे त्यांना तडकाफडकी नियंत्रण कक्षाचा रस्ता दाखविण्यात आला असल्याच्या पोलीस वर्तुळात चर्चा आहेत.

# अल्पसंख्याक आयोगाच्या अधिकृत कारागृह दौऱ्याचा विपर्यास

## खोटी व बदनामीकारक माहिती पसरविणाऱ्यांविरोधात कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाच्या शिष्टमंडळाने दिनांक ०८ सप्टेंबर २०२६ रोजी नाशिक मध्यवर्ती कारागृह तसेच दिनांक ०९ सप्टेंबर २०२६ रोजी अहिल्यानगर जिल्हा कारागृहास भेट देऊन तेथील अल्पसंख्याक समाजातील बंदीवानांसाठी उपलब्ध असलेल्या विविध सुविधा, मूलभूत व्यवस्था व प्रशासनाकडून करण्यात येणाऱ्या उपाययोजनांचा आढावा घेतला.

महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाच्या नाशिक व अहिल्यानगर येथील अधिकृत कारागृह दौऱ्याचा जाणीवपूर्वक विपर्यास करून विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाच्या काही व्यक्तींकडून आयोगाची बदनामी करण्याचा आणि समाजात गैरसमज पसरविण्याचा प्रयत्न केला जात आहे. अधिकृत कागदपत्रे उपलब्ध असतानाही तथ्यहीन आणि बेजबाबदार आरोप करून दोन समाजांमध्ये तेढ अथवा वैमनस्य निर्माण होईल असे वातावरण तयार करण्याचा प्रयत्न करणे ही अत्यंत गंभीर बाब आहे.

महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग ही कायद्याने स्थापन झालेली वैधानिक संस्था असून आयोगाला त्याची वैधानिक कर्तव्ये पार पाडताना दिवाणी न्यायालयाचे काही अधिकार प्राप्त आहेत. अल्पसंख्याक समाजातील व्यक्तींच्या हक्कांशी संबंधित बाबी, त्यांच्या तक्रारी तसेच त्यांना उपलब्ध असलेल्या सोयी-सुविधांची वस्तुस्थिती जाणून घेणे आणि त्यासंदभार्तील विविध बाबींची पाहणी करणे हा आयोगाच्या कामकाजाचा भाग आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाच्या सचिवांनी ३१ ऑगस्ट २०२६ रोजी अपर पोलीस महासंचालक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य यांना अधिकृत पत्र पाठवून नाशिक व अहिल्यानगर येथील कारागृह दौऱ्यासाठी मान्यता व आवश्यक व्यवस्था करण्याची विनंती केली होती. त्यानंतर २ सप्टेंबर २०२६ रोजी अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा यांच्या कार्यालयाने नाशिक रोड मध्यवर्ती कारागृह आणि अहिल्यानगर जिल्हा कारागृह प्रशासनाला लेखी निर्देश दिले. त्यामध्ये आयोगाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य व सचिवांसह १४ पदाधिकारी/ अधिकाऱ्यांच्या नियोजित भेटीचा स्पष्ट उल्लेख करण्यात आला होता. नाशिक येथील दौरा ८ सप्टेंबर आणि अहिल्यानगर येथील दौरा ९ सप्टेंबर रोजी नियोजित असल्याचेही पत्रात स्पष्टपणे नमूद करण्यात आले होते.

त्यामुळे हा दौरा कोणत्याही प्रकारे गुप्त, खासगी अथवा अनधिकृत नव्हता. आयोगाचा अधिकृत पत्रव्यवहार, कारागृह विभागाची मान्यता आणि संबंधित कारागृह प्रशासनाला देण्यात आलेल्या लेखी सूचनांनुसारच हा दौरा आयोजित करण्यात आला होता. या दौऱ्याबाबतची संपूर्ण प्रशासकीय प्रक्रिया अधिकृत कागदपत्रांमध्ये स्पष्टपणे नोंदविण्यात आलेली आहे.

असे असतानाही आयोगाने एखाद्या दहशतवाद्याची कारागृहात गुप्तपणे भेट घेतली तसेच संबंधित व्यक्तीला तुरुंगातून बाहेर काढण्यासाठी अथवा त्याच्या सुटकेसाठी निर्देश दिले, अशा स्वरूपाचे बेजबाबदार आणि तथ्यहीन आरोप काही व्यक्तींकडून करण्यात येत आहेत. आयोगाच्या अधिकृत दौऱ्याला जाणीवपूर्वक वेगळे स्वरूप देऊन आयोगाची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न आहे.

कारागृहातील कोणत्याही बंदीची सुटका ही प्रचलित कायदे, सक्षम प्राधिकरण आणि संबंधित न्यायालयीन प्रक्रियेनुसारच होऊ शकते. अशा परिस्थितीत आयोगाकडून एखाद्या बंदीला तुरुंगातून बाहेर काढण्याचे किंवा त्याची सुटका करण्याचे निर्देश दिल्याचा दावा करणे हे कायदेशीर व प्रशासकीय प्रक्रियेबाबतचे अज्ञान दर्शविणारे आहे. आयोगाच्या अधिकृत दौऱ्याला एखाद्या व्यक्तीच्या कथित गुप्त भेटीचे स्वरूप देणे आणि त्यातून संबंधित बंदीच्या सुटकेसाठी प्रयत्न झाल्याचा आभास निर्माण करणे हे अत्यंत बेजबाबदार आहे.

आरोप करणाऱ्या व्यक्तींकडून करण्यात येणारी विधाने बालिश आणि कायदेशीर व प्रशासकीय प्रक्रियेबाबतचे अज्ञान दर्शविणारी आहेत. एखाद्या व्यक्तीला राजकीय अथवा वैयक्तिक हेतूने लक्ष्य करण्याच्या प्रयत्नात कायद्याने स्थापन झालेल्या संस्थेच्या अधिकृत कामकाजाची बदनामी करून त्या संस्थेबद्दल जनमानसात अविश्वास निर्माण करणे योग्य नाही.

एखाद्या वैधानिक संस्थेच्या अधिकृत कामकाजाचा जाणीवपूर्वक विपर्यास करून लोकांच्या भावना भडकावणे, दोन समाजांमध्ये गैरसमज, तेढ किंवा वैमनस्य निर्माण करण्याचा प्रयत्न करणे ही बाब केवळ एखाद्या व्यक्तीच्या बदनामीपुरती मर्यादित राहत नाही. अशा प्रकारच्या प्रचारातून वैधानिक संस्थांविषयी जनमानसात अविश्वासाचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न होत असेल तर त्याची गंभीर दखल घेणे आवश्यक आहे.

आयोगाची जाणीवपूर्वक बदनामी करणे, खोटी अथवा दिशाभूल करणारी माहिती प्रसारित करणे, तथ्यांचा विपर्यास करणे तसेच दोन समाजांमध्ये तेढ अथवा वैमनस्य निर्माण होईल अशा स्वरूपाची वक्तव्ये करणे याची गंभीर दखल घेण्यात आली आहे. संबंधित व्यक्तींची विधाने, सोशल मीडिया पोस्ट, व्हिडिओ तसेच इतर उपलब्ध पुरावे संकलित करण्यात येत असून अशा सर्व संबंधित व्यक्तींविरोधात कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

विशेष म्हणजे आरोप करणाऱ्या काही व्यक्तींविरोधात यापूर्वी विविध स्वरूपाचे गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. त्यापैकी काही व्यक्ती गंभीर स्वरूपाच्या प्रकरणांमध्ये जामिनावर असल्याचेही सांगण्यात येत आहे. या संदर्भातील अधिकृत पोलीस व न्यायालयीन नोंदींची पडताळणी करून आवश्यक त्या बाबी कायदेशीर प्रक्रियेत मांडण्यात येतील. त्यामुळे कोणत्याही व्यक्तीने आयोगाबद्दल बेछूट व बदनामीकारक विधाने करणे टाळावे.

लोकशाही व्यवस्थेत प्रश्न विचारण्याचा, मत मांडण्याचा आणि टीका करण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे. मात्र खोटी माहिती पसरविणे, तथ्यांचा जाणीवपूर्वक विपर्यास करणे, एखाद्या व्यक्तीची बदनामी करणे, दोन समाजांमध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करणे किंवा वैधानिक संस्थेच्या अधिकृत कामकाजाबाबत जनमानसात हेतुपुरस्सर अविश्वास निर्माण करणे स्वीकारार्ह नाही.

महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग आपली सर्व वैधानिक कर्तव्ये कायद्याच्या चौकटीत आणि निर्धारित प्रशासकीय प्रक्रियेनुसार पार पाडत आहे. आयोगाच्या अधिकृत कामकाजासंदर्भात कोणाला प्रश्न उपस्थित करायचे असल्यास त्यांनी तथ्ये आणि अधिकृत कागदपत्रांच्या आधारे ते करावेत. खोटे, निराधार आणि बदनामीकारक आरोप करून सामाजिक वातावरण दूषित करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांविरोधात कायद्यानुसार आवश्यक ती कारवाई करण्यात येईल. हे प्रसिद्धी पत्रक महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचे सदस्य अहमद देशमुख व सदस्य शेख वसिम शेख यांनी जारी केले आहे.

---

## थोडक्यात

### १९ ऑक्टोबरला आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाचा राज्यव्यापी कार्यकर्ता मेळावा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

धम्मचक्र परिवर्तन दिनाच्या पूर्वसंध्येला आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाच्यावतीने १९ ऑक्टोबर रोजी राज्यव्यापी कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी १ वाजता. सीताबर्डी येथील विदर्भ हिंदी साहित्य संमेलनाच्या सभागृहात हा मेळावा होणार आहे. मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष नारायणराव बागडे मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी राहणार आहेत. राष्ट्रीय रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अण्णासाहेब कटारे (नाशिक) यांच्या हस्ते मेळाव्याचे उद्घाटन होणार आहे. रिपब्लिकन चळवळीतील ज्येष्ठ नेते भाई तानसेन नन्नवरे (मुंबई), सैय्यद रालिम बापू (मराठवाडा), डॉ. सुधा जनबंधू (विदर्भ), सुनीता दाभाडे (खान्देश), दशरथ कांबळे (पश्चिम महाराष्ट्र) आणि उत्तमराव गायकवाड (कोकण) यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. स्वागताध्यक्ष म्हणून प्रा. रमेश दुपारे आणि वैशाली तभाने यांची भूमिका राहणार आहे. या मेळाव्यात कार्यकर्त्यांची आर्थिक परिस्थिती, रिपब्लिकन पक्षाची सद्यस्थिती व वाटचाल, प्रस्थापित रिपब्लिकन नेत्यांची भूमिका आणि सत्तेसोबतचे संबंध यावर चर्चा होणार आहे. तसेच महिला, युवक आणि विद्यार्थ्यांच्या विविध समस्यांवरही गहन चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे.

मेळाव्याच्या माध्यमातून राज्यातील कार्यकर्त्यांच्या प्रश्नांना व्यासपीठ मिळवून देण्यासह रिपब्लिकन चळवळीसमोरील आव्हानांवर चर्चा केली जाणार असल्याचे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण बागडे यांनी पत्रपरिषदेत सांगितले. पत्रपरिषदेला नामदेवराव निकोसे, देवेंद्र बागडे, प्रा. रमेश दुपारे, प्रवीण आवळे, प्रकाश कांबळे, राजूदादा पांजरे, डॉ. सुधा जनबंधू, वैशाली तभाने, पुण्यशील बोदिले, घेमाजी बागडे, अतुल गंगापूरकर आणि नरेश खन्ना उपस्थित होते.

### ताथवडे शाळेतील विद्यार्थ्यांनी अनुभवले खेळातून विज्ञान

**दै. सिंहवाणी वृत्त, पुणे**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ताथवडे येथे विश्वास बागुल यांनी छोट्या छोट्या विज्ञान प्रयोगांच्या माध्यमातून खेळातून विज्ञान या विषयावर मनोरंजक पद्धतीने विज्ञानातील छोटे छोटे प्रयोग सादर करत



विद्यार्थ्यांना प्रयोगातून विज्ञानाच्या गमतीजमती सांगितल्या. या कार्यक्रमाला शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. मुळशी तालुक्यात उपक्रमशील शाळा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ताथवडे येथे विद्यार्थ्यांसाठी नेहमीच आनंददायी उपक्रम राबविण्यात येतात. विद्यार्थ्यांना मनोरंजक पद्धतीने विज्ञानाचा अनुभव घेता यावा यासाठी विश्वास बागुल यांना आमंत्रित करण्यात आले होते. यावेळी बागुल यांनी गती गतीचे प्रकार आंदोलिक गती म्हणजे काय या गोष्टी समजून घेत प्रयोगाच्या सहाय्याने मनोरंजक पद्धतीने समजून सांगितले. काड्यांच्या साह्याने कोण कसा तयार होतो, कोणाचे प्रकार समजून सांगत लघुकोन, काटकोन आणि विशाल कोणाची संकल्पना विद्यार्थ्यांना समजून दिली. तसेच हवेच्या दाबाने पाणी कसे बाहेर पडते हे प्रयोगातून समजून दिले.

यावेळी मुख्याध्यापक संगिता सूर्यवंशी, कविता मोहिते, भारती जाधव, जयश्री दांगडे, सारिका भालेकर, शिवप्रसाद गुट्टे, प्रिती चव्हाण आणि साहित्यिक शिक्षक सचिन बेंडभर उपस्थित होते. मारुंजी केंद्राचे केंद्रप्रमुख सुरेश साबळे यांनी या उपक्रमाचे कौतुक केले आहे. गटशिक्षणाधिकारी संग्राम पाटील आणि गटविकास अधिकारी सुधीर भागवत यांनी शिक्षकांचे अभिनंदन करत शाळेला शुभेच्छा दिल्या आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साहित्यिक शिक्षक सचिन बेंडभर यांनी केले. तर मुख्याध्यापक संगिता सूर्यवंशी यांनी आभार मानले.

### पाठ्यपुस्तकातील पानांतून अवतरले बचत पाठाचे लेखक





**दै. सिंहवाणी वृत्त, पुणे**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चौफुला येथे प्रसिद्ध लेखक सचिन बेंडभर यांनी भेट देऊन इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांना बचत धडा शिकवला. यावेळी अचानक पाठ्यपुस्तकातील धड्यातील पानांतून लेखकाला समोर पाहून विद्यार्थी अचंबित झाले. यावेळी त्यांच्या चेहऱ्यावर आनंद अवर्णनीय होता. यावेळी बेंडभर यांनी मुलांना गोष्टीची पुस्तके भेट म्हणून दिली. पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चौफुला येथील विद्यार्थ्यांशी लेखकाने प्रत्यक्ष संवाद साधला. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना बचत या पाठाविषयी चर्चा झाली. यावेळी कथेतील उपक्रम, कथेचा केलेला भावनिक शेवट आणि पात्रांची निवडलेली नावे यावरही चर्चा झाली. प्रत्यक्ष लेखकाकडून धडा शिकल्याने मुले आनंदून गेले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चौफुला येथे लेखक सचिन बेंडबर यांनी अचानक भेट दिली. त्यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना बचत धडा शिकवून बचतीचे महत्त्व सांगितले. पाठ्यपुस्तकातील लेखक प्रत्यक्ष समोर पाहून विद्यार्थी अचंबित झाली. यावेळी त्यांनी लेखकाशी संवाद साधून मनमोकळ्या गप्पा मारल्या.

विद्यार्थ्यांना अवांतर वाचनाची गोडी लागावी. मोबाईल सोडून त्यांनी वाचनाकडे वळावे यासाठी बेंडभर यांनी मुलांना काही गोष्टीची पुस्तके भेट म्हणून दिली. अचानक घडलेल्या या प्रसंगामुळे विद्यार्थी भारावून गेले. पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चौफुला येथील विद्यार्थ्यांशी लेखकाने प्रत्यक्ष संवाद साधला. शिक्षक आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधताना बचत या पाठाविषयी चर्चा झाली. यावेळी कथेतील उपक्रम, कथेचा केलेला भावनिक शेवट आणि पात्रांची निवडलेली नावे यावरही चर्चा झाली. प्रत्यक्ष लेखकाकडून धडा शिकल्याने मुले आनंदून गेले.

---

# सातगावचे वैद्यकीय अधिकारी डॉ. तेलसे यांच्या निलंबनाची मागणी

## जि.प. सदस्या वंदना काळे यांची मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांकडे शिफारस

**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे - सालेकसा**

तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र सातगाव येथे कार्यरत वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रशांत सी. तेलसे हे मुख्यालयी राहत नसून नागपूर येथून ये-जा करीत असल्याची तक्रार करण्यात आली आहे. तसेच ओपीडीच्या वेळेत ते स्वतः रुग्ण तपासणीसाठी उपस्थित राहत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणाची दखल घेत जिल्हा परिषद सदस्या वंदना काळे यांनी डॉ. तेलसे यांच्यावर कारवाई करून त्यांना निलंबित करावे, अशी शिफारस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडे केली आहे.



जि.प. सदस्या वंदना काळे यांनी दिलेल्या निवेदनानुसार, प्राथमिक आरोग्य केंद्र सातगाव येथे वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत असलेले डॉ. प्रशांत तेलसे हे मुख्यालयी राहत नसून नागपूर येथून ये-जा करीत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले आहे. ओपीडीच्या वेळेत इतर डॉक्टरांकडून रुग्णांची तपासणी केली जाते, तर संबंधित वैद्यकीय अधिकारी केवळ स्वाक्षरीचे काम करीत असल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे.

काळे यांनी पुढे म्हटले आहे की, त्यांनी स्वतः अनेकदा प्राथमिक आरोग्य केंद्र सातगाव येथे भेट दिली असता संबंधित वैद्यकीय अधिकारी उपस्थित आढळले नाहीत. तसेच रात्रीच्या वेळीदेखील ते आरोग्य केंद्रात उपलब्ध राहत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

दरम्यान, प्राथमिक आरोग्य केंद्रातील जुन्या लोखंडी खिडक्या व ग्रील याबाबतही निवेदनात गंभीर आरोप करण्यात आले आहेत. अंदाजे १५ क्विंटल लोखंडी साहित्याचा नियमानुसार लिलाव न करता परस्पर विक्री करून आर्थिक गैरव्यवहार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच जिल्हा परिषदेमार्फत मंजूर असलेल्या बांधकामाच्या कामात हस्तक्षेप करून कंत्राटदारावर दबाव आणण्याचा प्रयत्न केला जात असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या सर्व प्रकरणांची सखोल चौकशी करून संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यावर प्रशासकीय कारवाई करावी, तसेच विभागीय चौकशी करून आरोपांची सत्यता तपासावी, अशी मागणी जि.प. सदस्या वंदना काळे यांनी केली आहे. निलंबनाच्या शिफारस पत्राची प्रत त्यांनी जि.प. अध्यक्ष, उपाध्यक्ष तसेच आरोग्य सभापती यांनाही दिली आहे. या प्रकरणातील आरोपांची अधिकृत चौकशी होऊन त्यातून वस्तुस्थिती स्पष्ट होणे अपेक्षित आहे.

---

### कंत्राटी शिक्षकांच्या पदभरतीमध्ये भूमिपुत्रांना प्राधान्य द्या : लोकाधिकार सेनेचे मनपा आयुक्तांना निवेदन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर महानगर पालिकेच्या आयुक्तांना कंत्राटी पद्धतीने तात्पुरत्या स्वरूपात होणाऱ्या शिक्षकांच्या पदभरतीमध्ये १००% स्थानिक भूमिपुत्रांना प्राधान्य देण्याबाबत नागपूर-वर्धा जिल्हा स्थानिय लोकाधिकार सेनेचे अध्यक्ष राजा रामद्वार व शिवसेना जिल्हाप्रमुख तथा नगरसेवक सुरज गोजे यांच्या संयुक्त नेतृत्वात निवेदन देण्यात आले. या प्रसंगी माजी नगरसेवक अजय दलाल, पाटील, स्थानीय लोकाधिकार सेनेचे पदाधिकारी पंचबुधे, माहुरे, पारधी, आसिफ, जवंजाळ, वावरे उपस्थित होते.

---

# ११ बालकांच्या आयुष्याला मिळाली नवी दिशा : तीन अनाथांना लाभले मायेचे छत्र

**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर-धनंजय पांढरे**

कुणाला आई-बाबांच्या मायेची प्रतीक्षा, कुणाला घराच्या उबदारपणाची आस, तर कुणाच्या आयुष्यात कुटुंबाची पोकळी... अशा ११ बालकांच्या आयुष्याला चंद्रपुरात एकाच दिवशी नवी दिशा मिळाली. जिल्हाधिकारी वसुमना पंत यांच्या आदेशाने जिल्ह्यातील प्रलंबित ११ दत्तक प्रकरणे एकाच दिवशी निकाली काढण्यात आली.

यामध्ये चार नात्यांतर्गत दत्तक, चार सावत्र दत्तक आणि तीन अनाथ बालकांच्या दत्तक प्रकरणांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, तीन अनाथ बालकांना देश-विदेशातील कुटुंबांचा आधार मिळाला असून, एका बालकाच्या वाट्याला थेट युरोपमधील माल्टा येथील पालकांचे मायेचे छत्र आले आहे.बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ मध्ये २०२१ मध्ये करण्यात आलेल्या सुधारणेनुसार दत्तक प्रकरणांमध्ये अंतिम आदेश पारित करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. या तरतुदीला मुंबई उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. मात्र, ४ मे २०२६ रोजी न्यायालयाने संबंधित तरतुदींची वैधता कायम ठेवली. त्यामुळे दत्तक नियमावली, २०२२ अंतर्गत दत्तक प्रकरणांमध्ये



अंतिम आदेश देण्याचा मार्ग पुन्हा स्पष्ट झाला.

या निर्णयाच्या अनुषंगाने जिल्हा न्यायालय, चंद्रपूर येथील अंतिम आदेशासाठी प्रलंबित असलेली ११ दत्तक प्रकरणे जिल्हाधिकारी कार्यालयाकडे हस्तांतरित करण्यात आली. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी मीनाक्षी भस्मे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अजय साखरकर आणि विधी तथा परिविक्षा अधिकारी सचिंद्र नाईक यांनी सर्व प्रकरणांची आवश्यक पडताळणी पूर्ण केली.

यानंतर दत्तक इच्छुक पालकांना जिल्हाधिकारी वसुमना पंत यांच्यासमोर उपस्थित करण्यात आले. सर्व आवश्यक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी एकाच दिवशी ११ दत्तक प्रकरणांमध्ये अंतिम आदेश पारित केले. या निर्णयामुळे दीर्घकाळ प्रतीक्षेत असलेल्या बालकांना कुटुंबाचा आधार मिळण्याचा मार्ग मोकळा झाला.

तीन अनाथ बालकांसाठी हा दिवस विशेष ठरला. त्यापैकी एका बालकाला माल्टा येथील पालकांचे, दुसऱ्या बालकाला कर्नाटकातील हुबळी येथील पालकांचे, तर तिसऱ्या बालकाला महाराष्ट्रातील ठाणे येथील पालकांचे कुटुंब मिळाले. आजवर कुटुंबाच्या मायेपासून दूर असलेल्या या बालकांच्या आयुष्यात आता आई-वडिलांची माया, घराची ऊब आणि सुरक्षित भवितव्य येणार आहे.

यापूर्वी २०२२ मध्ये जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या आदेशाने एक दत्तक प्रकरण निकाली काढण्यात आले होते. त्यानंतर न्यायालयीन प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर दत्तक प्रकरणांची कार्यवाही जिल्हा न्यायालयामार्फत सुरू होती. मुंबई उच्च न्यायालयाच्या ४ मे २०२६ रोजीच्या आदेशानंतर जिल्हाधिकाऱ्यांकडे अंतिम आदेश पारित करण्याचे अधिकार स्पष्ट झाल्याने दत्तक प्रक्रियेला आता अधिक वेग मिळण्याची शक्यता आहे.

दत्तक प्रक्रियेबाबत अधिक माहितीसाठी नागरिकांनी जिल्हा बाल संरक्षण कक्ष, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, आकाशवाणीच्या मागे, जिल्हा स्टेडियमजवळ, साईबाबा वॉर्ड, चंद्रपूर येथे संपर्क साधावा. तसेच चाईल्ड हेल्पलाईनच्या टोल फ्री १०९८ क्रमांकावर संपर्क साधता येईल, असे आवाहन जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अजय आर. साखरकर यांनी केले आहे.

थोडक्यात

## 'ऋतुरंग' हा विशेष सांगीतिक कार्यक्रम उद्या

### पं. कुमार गंधर्व यांच्या निसर्ग आणि ऋतुवर्णनपर बंदिशींची प्रस्तुती

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

पंडित कुमार गंधर्व यांच्या निसर्ग आणि ऋतूवर्णनपर बंदिशींची सुरेल प्रस्तुती असलेला 'ऋतुरंग' हा विशेष सांगीतिक कार्यक्रम गुरुवार, ८ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६.३० वाजता सायंटिफिक सभागृह, आठ रस्ता चौक, लक्ष्मीनगर, नागपूर येथे आयोजित करण्यात आला आहे. अरुणाई आणि सप्तक नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात येत असलेल्या या कार्यक्रमात प्रसिद्ध शास्त्रीय गायिका डॉ. साधना शिलेदार आणि डॉ. मुकुंद ओक हे पंडित कुमार गंधर्व यांच्या वैशिष्ट्यपूर्ण संगीत रचनांचे सादरीकरण करतील. त्यांना संदीप गुरुमुळे, विपुल ढोले आणि वीरथ वाडेगावकर वाद्यसंगत करणार आहेत. कार्यक्रमाचे निवेदन वृषाली देशपांडे करतील.

हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून प्रवेश निःशुल्क आहे. या दर्जेदार कार्यक्रमाचा रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आस्वाद घ्यावे, असे आवाहन अरुणाई व सप्तकतर्फे करण्यात आले आहे.

## शिक्षकांच्या विविध मागण्यांचे पंचायत समितीला निवेदन



**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघ, भिवापूर शाखेच्या वतीने शिक्षकांच्या विविध प्रलंबित मागण्यांसंदर्भात पंचायत समितीचे गटविकास अधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. शिक्षकांच्या प्रशासकीय व आर्थिक अडचणी तातडीने सोडविण्याची मागणी यावेळी करण्यात आली. शिक्षकांची सर्व्हिस बुक कॅम्प आयोजित करून नोंदी अद्ययावत करणे, पदवीधर शिक्षकांच्या वेतनश्रेणीसंदभार्तील नोंदी अद्ययावत करणे, तसेच शाळांचे वीज बिल ग्रामपंचायतीमार्फत भरण्याबाबत आवश्यक सूचना देण्याची मागणी संघटनेने केली. त्याचप्रमाणे शाळांमधील स्वच्छतागृहांची साफसफाई ग्रामपंचायतीमार्फत नियमितपणे करण्यासाठी कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली.

संचमान्यतेनुसार अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे प्रलंबित वेतन तातडीने काढण्यासाठी प्रयत्न करावेत, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली. तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभाग, जिल्हा आरोग्य अधिकारी किंवा वित्त विभाग यांच्याकडून मंजूर झालेली वैद्यकीय बिले पंचायत समितीच्या वित्त विभागाकडे आल्यानंतर वारंवार त्रुटी काढल्या जात असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. या प्रकरणात सकारात्मक निर्णय घेऊन शिक्षकांना अनावश्यक त्रासापासून दिलासा द्यावा, अशी मागणी करण्यात आली.

निवेदन स्वीकारल्यानंतर संबंधित गट विकास अधिकारी डॉ. चेतन जाधव, गटशिक्षणाधिकारी सोनटक्के यांनी मागण्यांवर शक्य तितक्या लवकर कार्यवाही करून प्रलंबित प्रश्न निकाली काढण्याचे आश्वासन संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना दिले. यावेळी आनंद गिरडकर, दिलीप जिभकाटे, ओमप्रकाश कांबळे, संतोष तुमडाम, नागोराव बोगाडे, रवींद्र पाटील, विकास नारदेलवार यांच्यासह संघटनेचे अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

# हिंदू रिसर्च फाऊंडेशनतर्फे 'सप्तर्षी' पुरस्कारांची घोषणा

## भालचंद्र नेमाडे, प्रा. व्ही. कामकोटी, प्रा. थलप्पिल प्रदीप, डॉ. अनिल सुतार, सुयश सिंह यांच्यासह नागपूरचे डॉ. वेदप्रकाश मिश्रा व प्रा. संजय ढोबळे यांचा समावेश



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

सन २००० पासून राष्ट्रीय स्तरावर कार्यरत असलेल्या हिंदू रिसर्च फाऊंडेशन, मुंबई-नागपूर या सार्वजनिक चॅरिटेबल संस्थेच्या वतीने साहित्य, कला आणि विज्ञान क्षेत्रातील सात मान्यवरांना दरवर्षी 'सप्तर्षी पुरस्कार' प्रदान करण्यात येतात. यंदा या पुरस्कारांचे पाचवे वर्ष असून, पुरस्काराचे स्वरूप एक लाख रुपये रोख आणि सन्मानपत्र असे आहे.

महर्षी वाल्मिकी, नागार्जुन, आचार्य भारद्वाज, आचार्य कणाद, देवशिल्पी विश्वकर्मा, आर्यभट्ट आणि आचार्य सुश्रुत या प्राचीन भारतीय ऋषींनी साहित्य, कला आणि विज्ञान क्षेत्रात केलेले विलक्षण योगदान आजच्या पिढीपर्यंत पोहोचावे, तसेच विविध क्षेत्रांतील त्यांच्या अजरामर कार्याचा गौरव जगभर व्हावा, या उद्देशाने हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

यंदाच्या पुरस्कारार्थींमध्ये प्रख्यात मराठी साहित्यिक, कादंबरीकार, कवी, समीक्षक आणि विद्वान पद्मश्री भालचंद्र वि. नेमाडे यांना महर्षी वाल्मिकी पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. प्रख्यात भारतीय संगणकशास्त्रज्ञ, शिक्षणतज्ज्ञ आणि आयआयटी मद्रासचे संचालक पद्मश्री प्रा. व्ही. कामकोटी वीझिनाथन यांना आर्यभट्ट पुरस्कार, तर प्रख्यात भारतीय शास्त्रज्ञ आणि आयआयटी मद्रासचे प्राध्यापक पद्मश्री प्रा. थलप्पिल प्रदीप यांना नागार्जुन पुरस्कार देण्यात येणार आहे. प्रख्यात भारतीय वास्तुविशारद आणि शिल्पकार डॉ. अनिल रामजी सुतार यांना विश्वकर्मा पुरस्कार, तर भारतीय अंतराळ तंत्रज्ञान क्षेत्रातील उद्योजक आणि गॅलेक्सआय स्पेस सोल्यूशन्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी व सहसंस्थापक सुयश सिंह यांना आचार्य भारद्वाज पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

नागपूरचे प्रख्यात वैद्यकीय शिक्षणतज्ज्ञ आणि दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्चचे प्रो-चॅन्सेलर डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांना आचार्य सुश्रुत पुरस्कार, तर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील भौतिकशास्त्राचे प्रख्यात प्राध्यापक प्रा. संजय जे. ढोबळे यांना आचार्य कणाद पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याचे संयोजक डॉ. टी. एस. भाल यांनी सांगितले.

**मान्यवर पुरस्कारार्थींची परंपरा**

सप्तर्षी पुरस्काराने आतापर्यंत पद्म भूषण नंबी नारायणन, पद्म विभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर, पद्म विभूषण डॉ. श्रीधरन, पद्म विभूषण डॉ. अनिल काकोडकर, पद्म भूषण डॉ. विजय भाटकर, पद्मश्री डॉ. गणपती यादव, महाकवी सुधाकर गायधनी, भारतरत्न डॉ. सी. एन. आर. राव, पद्म विभूषण डॉ. जयंत नारळीकर, पद्म भूषण डॉ. एस. एल. भैरप्पा, पद्मश्री एस. अरुणन, पद्म विभूषण प्रा. एम. एम. शर्मा, पद्मश्री रमेशजी पतंगे, पद्मश्री प्रह्लाद रामाराव, पद्मश्री डॉ. रवी ग्रोव्हर, प्रा. डॉ. जी. माधवी लता, प्रा. इंद्रनील बिस्वास आणि डॉ. अनिल गोल्हर यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांना गौरविण्यात आले आहे.

**सत्कारमूर्तींचा परिचय**

**पद्मश्री भालचंद्र वि. नेमाडे - महर्षी वाल्मिकी पुरस्कार**

प्रख्यात मराठी साहित्यिक, कादंबरीकार, कवी, समीक्षक आणि विद्वान म्हणून त्यांची ओळख आहे. भारतीय साहित्यात त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. कोसला आणि हिंदू : जगण्याची समृद्ध अडगळ यांसारख्या त्यांच्या गाजलेल्या साहित्यकृतींचा मराठी साहित्यावर दीर्घकालीन प्रभाव राहिला आहे. साहित्य अकादमी पुरस्कार, ज्ञानपीठ पुरस्कार यांसह अनेक प्रतिष्ठित साहित्यिक सन्मानांनी त्यांना गौरविण्यात आले असून त्यांना पद्मश्री पुरस्कारही प्राप्त झाला आहे.

**पद्मश्री प्रा. व्ही. कामकोटी वीझिनाथन - आर्यभट्ट पुरस्कार**

प्रख्यात भारतीय संगणकशास्त्रज्ञ, शिक्षणतज्ज्ञ आणि आयआयटी मद्रासचे संचालक म्हणून त्यांची ओळख आहे. संगणक आर्किटेक्चर, माहिती सुरक्षा, व्हीएलएसआय डिझाइन आणि स्वदेशी संगणकीय तंत्रज्ञान या क्षेत्रांत त्यांचे विशेष योगदान आहे. त्यांनी स्वदेशी मायक्रोप्रोसेसर शक्ती विकसित करण्याच्या कार्याचे नेतृत्व केले. या माध्यमातून भारताच्या सेमीकंडक्टर, सायबर सुरक्षा आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या क्षमतांना बळकटी देण्यात त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले आहे. त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

**पद्मश्री प्रा. थलप्पिल प्रदीप - नागार्जुन पुरस्कार**

प्रख्यात भारतीय शास्त्रज्ञ आणि आयआयटी मद्रासमधील प्राध्यापक म्हणून त्यांची ओळख आहे. नॅनोसायन्स, रसायनशास्त्रातील नॅनो पदार्थ आणि स्वच्छ पाणी तंत्रज्ञान या क्षेत्रांत त्यांनी अग्रगण्य संशोधन केले आहे. पिण्याच्या पाण्यातील विषारी घटक दूर करण्यासाठी त्यांनी विकसित केलेल्या तंत्रज्ञानाचा लाखो लोकांना लाभ झाला आहे. शांतिस्वरूप भटनागर पुरस्कार, विनफ्यूचर पुरस्कार, एनी पुरस्कार आणि प्रिन्स सुलतान आंतरराष्ट्रीय जल पुरस्कार यांसह अनेक प्रतिष्ठित सन्मानांनी त्यांना गौरविण्यात आले आहे. त्यांना पद्मश्री पुरस्कारही प्राप्त झाला आहे.

**श्री. डॉ. अनिल रामजी सुतार - विश्वकर्मा पुरस्कार**

प्रख्यात भारतीय वास्तुविशारद आणि शिल्पकार म्हणून त्यांची ओळख आहे. स्मारक शिल्पकला, वास्तुकला आणि भव्य सार्वजनिक स्मारकांच्या निर्मितीत त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. अनेक महत्त्वपूर्ण स्मारक प्रकल्पांशी ते संबंधित राहिले असून कांस्य शिल्पकला आणि सार्वजनिक कलेच्या क्षेत्रात त्यांनी व्यापक कार्य केले आहे. त्यांच्या सर्जनशील कार्यात कलात्मक दृष्टी, सांस्कृतिक वारसा आणि वास्तुशिल्पीय उत्कृष्टतेचा सुंदर संगम दिसून येतो. जगातील सर्वांत उंच पुतळा असलेल्या स्टॅच्यू ऑफ युनिटीच्या निर्मितीतही त्यांचे योगदान आहे.

**श्री. सुयश सिंह - आचार्य भारद्वाज पुरस्कार**

भारतीय अंतराळ तंत्रज्ञान क्षेत्रातील उद्योजक असून ते गॅलेक्सआय स्पेस सोल्यूशन्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि सहसंस्थापक आहेत. त्यांची कंपनी प्रगत पृथ्वी निरीक्षण उपग्रह तंत्रज्ञान विकसित करीत आहे. यात सिंथेटिक अपर्चर रडार आणि ऑप्टिकल इमेजिंग तंत्रज्ञानाचे एकत्रीकरण करून सर्व हवामान परिस्थितीत उच्च-रिझोल्यूशन प्रतिमा मिळविण्याची क्षमता विकसित केली जात आहे. त्यांच्या 'दृष्टी' मोहिमेच्या माध्यमातून पृथ्वी निरीक्षण, पायाभूत सुविधांचे निरीक्षण आणि संरक्षण क्षेत्रात भारताची क्षमता बळकट करण्याच्या दिशेने योगदान दिले जात आहे.

**डॉ. वेदप्रकाश मिश्रा - आचार्य सुश्रुत पुरस्कार**

नागपूरचे प्रख्यात वैद्यकीय शिक्षणतज्ज्ञ, शिक्षणक्षेत्रातील प्रशासक आणि आरोग्य क्षेत्रातील नेतृत्व म्हणून त्यांची ओळख आहे. वैद्यकीय शिक्षण, शैक्षणिक प्रशासन आणि आरोग्यसेवा विकास या क्षेत्रांत त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. विविध महत्त्वाच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक पदांवर त्यांनी कार्य केले आहे. सध्या ते दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्चचे प्रो-चॅन्सेलर आहेत. त्यांना डॉ. बी. सी. रॉय राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

**प्रा. संजय जे. ढोबळे - आचार्य कणाद पुरस्कार**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील भौतिकशास्त्राचे प्रख्यात प्राध्यापक म्हणून त्यांची ओळख आहे. ल्युमिनेसंट पदार्थ, सॉलिड-स्टेट लाइटिंग, रेडिएशन डोझिमेट्री, फॉस्फर मटेरियल्स आणि ऊर्जा-संबंधित तंत्रज्ञान या क्षेत्रांत त्यांचे संशोधन आहे. वैज्ञानिक संशोधन आणि शिक्षण क्षेत्रात त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले असून भौतिकशास्त्राच्या क्षेत्रातील अनेक संशोधकांना त्यांनी मार्गदर्शन केले आहे.

## बुधा निमकर यांचे निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा**



कोदामेंढी येथील वार्ड क्रमांक ३ चे रहिवासी बुधा रामचंद्र निमकर (९२) यांचे आज मंगळवार (ता. ६ ऑक्टोबर) रात्री ८ वाजेदरम्यान निधन झाले. त्यांच्यावर उद्या बुधवार (ता. ७ ऑक्टोबर) ला सकाळी १०.३० दरम्यान स्थानिक स्मशानभूमीत अंत्यसंस्कार होणार आहे. त्यांच्या पश्चात चार मुले, चार सुना, नातवंडे व बराच मोठा आप्तपरिवार आहे. ते तंटामुक्त समिती अध्यक्ष राम निमकर यांचे वडील होत.

## रशियात अज्ञात विषाणूमुळे मृत्यू

**मास्को :** रशियामध्ये एका अज्ञात विषाणूमुळे प्रयोगशाळेतील कर्मचा-याचा मृत्यू झाल्याने खळबळ उडाली आहे. १९७ जणांना क्वॉरंटाइन करण्यात आले आहे. प्लेग संशोधन प्रयोगशाळेत विषाणूचा नमुना असलेली टेस्ट ट्यूब फुटली होती. ही महिला अँटी-प्लेग संशोधन संस्थेत काम करत होती. अमेरिकेच्या तपास यंत्रणा एफबीआयने लॉस एंजेलिस विमानतळावरून वॅनयिंग झांग ऊर्फ हीदर झांग महिलेला अटक केली. या महिलेवर चीन सरकारसाठी काम करत तैवानचे राष्ट्राध्यक्ष लाई चिंग-ते यांच्या मुलावर पाळत ठेवून त्याची छायाचित्रे आणि व्हीडीओ चीनला पाठवल्याचा आरोप आहे.

## वीज कंत्राटी कामगारांचे दिवाळीत बेमुदत कामबंद आंदोलन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ संलग्न भारतीय मजदूर संघाची प्रदेश कार्यकारणी बैठक दि. ३ व ४ ऑक्टोबर रोजी पुणे येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. राज्यभरातून सुमारे ८० पदाधिकारी या बैठकीस उपस्थित होते. बैठकी दरम्यान ज्येष्ठ मार्गदर्शक आण्णाजी देसाई तसेच भारतीय मजदूर संघाचे संघटन मंत्री बाळासाहेब भुजबळ व अर्जुन चव्हाण यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. क्रिस्टल व स्मार्ट एजन्सी सह राज्यातील सर्व वीज कंत्राटी कामगारांना दिवाळी पूर्वी बोनस, वेतन व फरकाची रक्कम मिळावी, जादा कामाचा मोबदला मिळावा, कामगार बदली धोरण रद्द करावे, कंत्राटदारांनी सूड भावनेतून कामगारांना एकतर्फी कमी करू नये, कोर्ट संरक्षित कमी केलेल्या कामगारांना पुन्हा कामावर घ्यावे व त्यांच्या याद्या संपर्क पोर्टल ला दाखवाव्यात कंत्राटदार बदलले तरी कामगार तेच रहावे व सेवाजेष्टते कामगारांना रोजगार मिळावा, मेडिक्लेम सुविधा उपलब्ध करावी व अन्य अनेक मागण्यासाठी २७ ऑक्टोबर रोजी सर्व जिल्ह्यात व महावितरण चे मुख्यालय प्रकाशगड बांद्रा मुंबई येथे आंदोलन करण्याचा निर्धार सवार्नुमते झाला. मागील काळात केवळ आश्वासने मिळाली आता ठोस कृती हवी अन्यथा दिवाळीमध्ये ६ नोव्हेंबर पासून कामबंद करण्याचा निर्धार केल्याचे कार्याध्यक्ष राहुल बोडके यांनी सांगितले.

ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०२४ साली स्पष्ट निर्देश दिल्यानंतर सुद्धा प्रशासनाकडून मुजोर कंत्राटदारांवर कारवाई होत नसल्याने जीवाची पर्वा न करता जनतेला वीज सेवा देणाऱ्या कामगारांवर प्रचंड आर्थिक व सामाजिक अन्याय होत आहे. महाराष्ट्रात दुष्काळ पडला असून इकडे या कामगारांना अनेक महिने वेतन व मागील फरक नाही, प्रशासन केवळ आश्वासने देते मात्र पूर्ण करत नसल्याने दिवाळीत आंदोलना शिवाय पर्याय नसल्याचे संघटनेचे अध्यक्ष निलेश खरात म्हणाले या बैठकीस कार्याध्यक्ष राहुल बोडके, संघटनमंत्री उमेश आनेराव, कोषाध्यक्ष सागर पवार व उपमहामंत्री अमर लोहार यांची प्रमुख उपस्थिती होती. दोन दिवसातील विविध सत्रांत संघटनेच्या आगामी वाटचालीबाबत मार्गदर्शन केले. नवीन कार्यकारणीला नियुक्तीपत्रे देण्यात आली. बैठकीचे आभार प्रदर्शन पुणे झोन सचिव योगेश महागरे यांनी केले.

# नादुरुस्त रोहित्रांची माहिती एका क्लिकवर देता येणार, 'महावितरण मोबाईल ॲप'वर खास सोय

## प्रामुख्याने शेतकऱ्यांसह इतर वीजग्राहकांनाही सोय उपलब्ध

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

राज्यातील प्रामुख्याने शेतकरी आणि सर्वसामान्य वीजग्राहकांना सुरळीत वीजपुरवठा मिळावा यासाठी महावितरणने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. कोणत्याही भागातील नादुरुस्त किंवा बंद पडलेल्या रोहित्राची (ट्रान्सफॉर्मर) माहिती थेट 'महावितरण मोबाईल ॲप'द्वारे एका क्लिकवर देण्याची विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यामुळे नादुरुस्त रोहित्र ताबडतोब बदलणे किंवा दुरुस्त करणे लवकर शक्य होणार आहे. या ॲपद्वारे कोणालाही कोणत्याही ठिकाणच्या नादुरुस्त रोहित्राची माहिती देता येईल, हे विशेष. यासह महावितरणच्या www.mahadiscom.in वेबसाईटवर किंवा कॉल सेंटरमध्ये देखील तक्रार नोंदविण्याची सोय उपलब्ध आहे.

महावितरणने नादुरुस्त रोहित्र बदलण्यासाठी राज्यभरात यंत्रणा सज्ज ठेवली आहे. तथापि, नादुरुस्त किंवा बंद पडलेल्या रोहित्राची माहिती प्राप्त होण्यास विलंब होत असल्याचे दिसून आले. त्याची गंभीर नोंद घेत मा. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तथा महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी नादुरुस्त रोहित्रांची माहिती कळविण्यासाठी नागरिकांना 'महावितरण मोबाईल ॲप'द्वारे खास सोय उपलब्ध करून देण्याची सूचना केली. त्याप्रमाणे ही सुविधा ॲपवर कार्यान्वित झाली आहे.

महावितरणकडून राज्यभरातील ९ लाख २५ हजार वितरण रोहित्रांचे (डीटीसी) जिओ लोकेशनसह मॅपींग पूर्ण झाले आहे. त्यामुळे केवळ लोकेशनच्या आधारे नादुरुस्त रोहित्रांची माहिती देणे कोणालाही 'महावितरण मोबाईल ॲप'द्वारे शक्य झाले आहे. विशेष म्हणजे हे ॲप डाऊनलोड केलेल्या सर्व मोबाईलधारकास कोणत्याही ठिकाणच्या बंद किंवा नादुरुस्त रोहित्रांची माहिती कळविण्याची सोय मराठी व इंग्रजी भाषेमध्ये उपलब्ध आहे. हे ॲप डाऊनलोड करण्यासाठी 'प्ले स्टोअर' किंवा 'ॲपल स्टोअर'वर उपलब्ध आहे.

नादुरुस्त रोहित्राची अशी करा तक्रार- 'महावितरण मोबाईल ॲप'मध्ये ग्राहक क्रमांकासोबत लॉगिन किंवा लॉगिन न करता गेस्ट म्हणूनही नादुरुस्त रोहित्राची माहिती कळवता येईल. ही




माहिती कळविताना संबंधित नादुरुस्त रोहित्राच्या ठिकाणाजवळ असणे मात्र आवश्यक आहे. या ॲपमध्ये मुख्य पानावर 'नादुरुस्त रोहित्राची माहिती नोंदवा' या रकान्यावर क्लिक केल्यास पुढील पानावर नाव आणि व्हॉटस ॲपचा मोबाईल क्रमांक (लॉगिन नसल्यास) विचारला जाईल. तत्पूर्वी या ॲपमधील लोकेशन परमिशन 'ऑन' असणे आणि मोबाईल संचाचे लोकेशन सुरू करणे आवश्यक आहे. मोबाईल क्रमांक दिल्यानंतर ओटीपी निर्माण करण्यास सांगितले जाईल. हा ओटीपी संबंधितांना व्हॉट्स ॲपवर प्राप्त होईल. ओटीपी व्हेरीफाय झाल्यानंतर एका चौकटीत नादुरुस्त किंवा बंद रोहित्राचा 'फोटो काढा' असा पर्याय येईल. संबंधित नादुरुस्त रोहित्राचा केवळ फोटो काढावा. या चौकटीखालीच एका नकाशामध्ये अक्षांश-रेखांशासह रोहित्राचे रेखाचित्र, रोहित्राचे नाव व क्रमांक (डीटीसी नंबर) दिसेल. एकापेक्षा अधिक रोहित्र असल्यास जे नादुरुस्त आहे त्यावर क्लिक करता येईल. त्यानंतर 'नोंद करा' (सबमीट) पर्याय क्लिक केला की ही माहिती तात्काळ संबंधित कार्यालयातील अभियंता व जनमित्रांना मोबाईल संदेशाद्वारे प्राप्त होईल व रोहित्राची तपासणी करण्यात येईल. लहान दोष असल्यास रोहित्राची तात्काळ दुरुस्ती करण्यात येईल किंवा रोहित्र नादुरुस्त असल्यास ते ताबडतोब बदलण्यात येईल. रोहित्र दुरुस्त झाले किंवा बदलले याबाबत संबंधित तक्रारकर्त्यांना देखील व्हॉट्स ॲपद्वारे कळविण्यात येणार आहे.

महावितरणच्या वेबसाईट किंवा कॉल सेंटरद्वारे तक्रारीची सोयझ्र मोबाईल ॲपसोबतच नादुरुस्त रोहित्राची तक्रार किंवा माहिती देण्याची सोय महावितरणच्या www.mahadiscom.in या वेबसाईटवर, संबंधित कार्यालय किंवा ग्राहक सुविधा केंद्रामध्ये किंवा २४ तास सुरु असलेल्या १८००२१२३४३५/ १८००२३४३५/ १९१२ किंवा १९१२० या टोल फ्री क्रमांकावर उपलब्ध आहे. वेबसाईटवर ग्राहक रकान्यात जाऊन 'ऑनलाइन तक्रार नोंदवा'मध्ये ग्राहक क्रमांकाशी संबंधित रोहित्र नादुरुस्त झाल्याची तक्रार नोंदविता येईल. यासह या वेबसाईट किंवा महावितरण मोबाईल ॲपवरील 'ऊर्जा चॅट बॉट'द्वारे देखील इतर तक्रारींसोबतच मराठी व इंग्रजी संवादाद्वारे तक्रार दाखल करण्याची सोय उपलब्ध आहे.

थोडक्यात

## नरसाळा एसटीपीची आयुक्तांकडून पाहणी, २० दशलक्ष लिटर सांडपाण्यावर होणार प्रक्रिया



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नरसाळा येथील नागपूर महानगरपालिकेच्या सांडपाणी प्रक्रिया केंद्राच्या (एसटीपी) कामाची आयुक्त डॉ. विपीन यांनी आज (ता. ६) पाहणी केली. अमृत टप्पा २ अंतर्गत या परिसरातील ७ हजार घरांतील सांडपाण्यावर या एसटीपीमध्ये प्रक्रिया होणार असून, या कामाची आयुक्त डॉ. विपीन यांनी पाहणी केली. विशेष म्हणजे, या एसटीपीमध्ये प्रति दिन २० दशलक्ष लिटर सांडपाण्यावर प्रक्रिया केली जाणार आहे. यावेळी अतिरिक्त आयुक्त अंकित, अधीक्षक अभियंता डॉ. श्वेता बॅनर्जी, हनुमाननगर झोनचे सहाय्यक आयुक्त नरेंद्र बावनकर, कार्यकारी अभियंता राजेश दुफारे यांच्यासह पीएमसीचे प्रतिनिधी उपस्थित होते. या एसटीपीमुळे शहरातील पोहरा नदीतील प्रदूषणाचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे.

**पोहरा नदीतील प्रदूषण कमी होईल**

नरसाळा या परिसरातील जवळपास ७ हजार घरांतून निघणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी सिक्वेन्शीयल बॅच रिएक्टर तंत्रज्ञानावर आधारित या एसटीपीची निर्मिती करण्यात आली आहे. प्रत्येक घरातील सांडपाणी सिव्हरेज लाईनला जोडण्यासाठी एक मार्गदर्शक नियमावली मनपाच्या अधिकाऱ्यांनी तयार करावी, असे निर्देश डॉ. विपीन यांनी अधिकाऱ्यांना यावेळी दिले. यामुळे नागरिकांना घरातील सांडपाणी मनपाच्या सिव्हरेज लाईनला जोडण्यास मदत होईल. या एसटीपीमध्ये प्रक्रिया झालेले सांडपाणी नदीत सोडले जाणार आहे. यामुळे शहरातील पोहरा नदीतील प्रदूषण कमी होण्यास मदत होणार आहे.

## भारतीय राज्यघटनेने सर्व भारतीयांना समानतेचा अधिकार दिला : डॉ. मिलिंद जीवने



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

भारतीय संविधानाने समस्त भारतीयांना समानतेच्या सूत्रात बांधले असून स्त्री-पुरुष, लिंगभेद व अस्पृश्यतेला संविधानात स्थान नाही, असे प्रतिपादन सिव्हिल राईट्स प्रोटेक्शन सेलचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. मिलिंद जीवने यांनी केले. सिव्हिल राईट्स प्रोटेक्शन सेल / सीआरपीसी वुमेन विंग / सीआरपीसी फिनिक्स विंग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर सीआरपीसी राष्ट्रीय पुरस्कार व सावित्रीबाई फुले -रमाई आंबेडकर इन्स्पायरिंग पुरस्कार २०२६ वितरण सोहळ्यात ते अध्यक्षपदावरून बोलत होते.

डॉ. जीवने म्हणाले, "बाबासाहेबांनी मनुस्मृती या धर्म विकृत ग्रंथाची होळी करून समताधिष्ठित संविधान भारताला दिले. या संविधानामुळे स्त्री वगार्ला व अस्पृश्य वर्गाला समानतेचा, संपत्ती ग्रहण करण्याचा व मुक्तपणे वावर करण्याचा अधिकार मिळाला. धर्म स्वातंत्र्य दिले असले तरी स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नाही. हा पुरस्कार वितरण सोहळा डॉ. आंबेडकर आंतरराष्ट्रीय केंद्रातील नागार्जुन सभागृहात पार पडला. या सोहळ्यात व्यासपीठावर एड. डॉ. मोहन गवई, एड. राजेश लाख, इंजि. मनोज झोडापे, ऋतुजा जयस्वाल, वर्षा शामकुळे विराजमान होते. यावेळी डॉ. आंबेडकर सीआरपीसी राष्ट्रीय पुरस्कार डॉ. प्रमोद चिंचखेडे, प्रा. डॉ. नितीन तागडे, सीमा बांधनकर, ज्युली चार्ल्स यांना प्रदान करण्यात आला. तर सावित्रीबाई फुले - रमाई आंबेडकर इंस्पायरिंग पुरस्कार सूर्यमान घोडे, डॉ. राजेश नंदेश्वर, मिस्टर डेला मरियन, डॉ. अभिजित बक्षी, मिसेस जोनिफर पिल्ले कांबळे, मिसेस राजश्री बावने, मिसेस सुनिता झा, निसंत नंदिनी निरंजन लखंडा, इंजि. मनोज झोडापे, सजीवन वालदे, एड. बबीता मेश्राम, दिलीप तांडवे, इंजि. गीतांजली नगराळे, राजेंद्र घोरपडे यांना माला व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. सूत्रसंचालन जोनिफर पिल्ले यांनी तर आभार मरीयन यांनी मानले.

## जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नागपूरतर्फे आयोजित विभागीय तायक्वांदो स्पर्धेत सावनेरच्या मृणाली पाटीलचे सुवर्णयश

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नागपूर यांच्यातर्फे शुक्रवार, दिनांक २ ऑक्टोबर २०२६ रोजी नागपूर विभागीय तायक्वांदो स्पर्धेचे



आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत जवाहरलाल नेहरू हायस्कूल, सावनेरची विद्यार्थिनी कु. मृणाली नरेंद्र पाटील हिने दमदार कामगिरी करत १४ वर्षे वयोगटात जिल्हास्तरीय स्पर्धेत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. या सुवर्णपदकासह मृणालीने राज्यस्तरीय तायक्वांदो स्पर्धेत आपले स्थान निश्चित केले आहे. तिने स्पर्धेदरम्यान उत्कृष्ट क्रीडा कौशल्याचे प्रदर्शन केले. यशाचे श्रेय तिने तिचे प्रशिक्षक ब्लॅक बेल्ट मनोज बघारे सर व आपल्या आई वडिलांना दिले आहे. मृणालीच्या या यशाबद्दल रामटेक लोकसभा क्षेत्राचे खासदार शामकुमार बर्वे, क्षेत्राचे आमदार आशिष देशमुख, माजी मंत्री सुनील केदार व शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, तसेच सावनेर परिसरातून तिचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. तिला राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# ७० व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या तयारीचा आयुक्तांनी घेतला आढावा

### मनपाद्वारे १८ ते २२ ऑक्टोबर दरम्यान सुविधांची उत्तम व्यवस्था

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

यंदाच्या ७० व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या अनुषंगाने दीक्षाभूमीवर येणाऱ्या लाखो अनुयायांच्या सोयीसाठी नागपूर महानगरपालिका, जिल्हा प्रशासन व समाज कल्याण विभागाद्वारे उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या विविध सुविधांच्या तयारीचा मनपा आयुक्त डॉ. विपीन यांनी मंगळवारी (ता.६) आढावा घेतला. मनपा मुख्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारतीतील आयुक्त सभा कक्षात झालेल्या बैठकीत अतिरिक्त आयुक्त अंकित, अतिरिक्त आयुक्त मुरुगानंथम एम., अतिरिक्त आयुक्त मिलिंद मेश्राम, समाज कल्याण विभागाच्या सहायक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे, मनपाच्या मुख्य अभियंता लीना उपाध्ये, मुख्य अग्निशमन अधिकारी राजेंद्र उचके, अधीक्षक अभियंता डॉ. श्वेता बॅनर्जी, अधीक्षक अभियंता विजय गुरूबक्षाणी, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर, कार्यकारी अभियंता श्रीकांत वाईकर, राजेंद्र राठोड, मनोज गद्रे, राजीव गौतम, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, सार्वजनिक बांधकाम विभागाचे गुल्हाने, मनपाचे सहायक आयुक्त धनंजय जाधव, राजकुमार मेश्राम, परिवहन प्रशासकीय अधिकारी योगेश लुंगे यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते.

धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त देशभरातून लाखोंच्या संख्येत अनुयायी नागपूर शहरातील दीक्षाभूमीला भेट देतात. या सर्व नागरिकांच्या सोयीसाठी नागपूर महानगरपालिका, जिल्हा प्रशासन, समाज कल्याण विभाग व पोलीस प्रशासन यांच्याद्वारे रविवार १८ ते गुरूवार २२ ऑक्टोबर या कालावधीमध्ये सर्व मुलभूत सुविधांची व्यवस्था सुनिश्चित करण्याचे निर्देश मनपा आयुक्त डॉ.विपीन यांनी दिले. याशिवाय सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने कार्य करून अनुयायांसाठी उत्तम सोयीसुविधा पुरविण्याच्या सूचना दिल्या.

तसेच नागरिकांची गैरसोय होऊ नये, त्यांना तात्काळ मदत मिळावी यासाठी मनपाचे नियंत्रण कक्ष स्थापन करणे, संपूर्ण परिसरात स्वच्छता राखणे, सर्वत्र विद्युत पुरवठा करणे, पिण्याचे




पाणी, शौचालय, परिवहन सेवा या सर्व सुविधा सुरळीतपणे चालविल्या जातील, या दृष्टीने नियोजन करण्याचेही आयुक्त डॉ. विपीन यांनी निर्देशित केले. धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी दीक्षाभूमीवर येणाऱ्या अनुयायांच्या संख्या लक्षात घेता १८ ते २२ ऑक्टोबर या कालावधीमध्ये नागपूर महानगरपालिकेद्वारे दीक्षाभूमीवर अनुयायांसाठी आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत, यंदा दीक्षाभूमी परिसर, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ परिसर, माता कचेरी, कुर्वेज शाळा परिसर, आदी ठिकाणी अनुयायांच्या सुविधेसाठी मोठे डोम उभारण्यात येणार आहेत. तसेच बेझनबाग मैदान व उंटखाना मैदानात निवासाची व्यवस्था सामाजिक न्याय व जिल्हा प्रशासन नागपूर, मनपाद्वारे शौचालयाची व्यवस्था केली जाणार आहे.

डोमच्या शेजारी अनुयायांसाठी तात्पुरत्या स्वरुपात शौचालयांची व्यवस्था करणे, दीक्षाभूमीवर येणाऱ्या अनुयायांच्या सेवेसाठी मनपाच्या आरोग्य तपासणी केंद्रांची व्यवस्था करणे. संपूर्ण दीक्षाभूमी परिसरात स्वच्छतेसाठी स्वच्छता कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे, संपूर्ण परिसरामध्ये सीसीटीव्ही कॅमे-यांची निगराणी ठेवणे. आदी बाबांवर बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. याशिवाय अंबाझरी तलावावर अनुयायी मोठ्या संख्येत आंघोळीसाठी जात असतात या ठिकाणी सुरक्षेच्या दृष्टीने अग्निशमन विभागाची चमू, बोट तैनात करण्यासह अंघोळीसाठी तलावात न जाता त्यांना तलावालागतच प्रसाधनगृहांची व्यवस्था उपलब्ध करून देण्यासह आवश्यक त्या सर्व ठिकाणी अतिरिक्त प्रसाधन गृह, शौचालय उभारण्याचे ही निर्देश आयुक्त डॉ. विपीन यांनी दिले.

## नागपूर-वर्धा जिल्ह्यातील उद्योगांना सुरळीत वीजपुरवठा देण्यास महावितरण कटिबद्ध

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

औद्योगिक ग्राहक हा महावितरणच्या महसुलाचा मुख्य कणा असून, वीजपुरवठ्याच्या समस्येमुळे कोणत्याही उद्योगाला फटका बसू नये हीच महावितरणची सर्वोच्च प्राथमिकता आहे. नागपूर आणि वर्धा जिल्ह्यातील उद्योजकांना अत्यंत तत्पर, अखंड आणि दर्जेदार वीजपुरवठा देण्यासाठी महावितरण पूर्णपणे कटिबद्ध असून यासाठी क्षेत्रीय कामकाजात अधिक सुसूत्रता, सुलभता आणि गती आणली जाईल, अशी ग्वाही महावितरणचे संचालक (संचालन) धनंजय औंढेकर यांनी दिली.

नागपूर येथील विद्युत भवन या परिमंडल कार्यालयात आयोजित विशेष बैठकीत नागपूर व वर्धा जिल्ह्यातील प्रमुख औद्योगिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांशी थेट संवाद साधताना ते बोलत होते. या प्रसंगी त्यांनी उद्योजकांच्या विविध समस्या व अडचणी आस्थेने ऐकून घेत त्यांच्या तात्काळ निराकरणासाठी




**संचालक धनंजय औंढेकर यांची ग्वाही**

संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांना स्पष्ट निर्देश दिले. या बैठकीला नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता राजेश नाईक, महापारेषणचे मुख्य अभियंता सतिश अणे, अधीक्षक अभियंता अमित परांजपे, प्रफुल लांडे, संजय वाकडे, स्मीता पारखी, वैभव पातोडे आणि दिपाली माडेलवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

संचालक धनंजय औंढेकर यांनी पुढे स्पष्ट केले की, औद्योगिक ग्राहकांना विनाव्यत्यय वीजपुरवठा मिळावा यासाठी स्थानिक वीज वितरण यंत्रणेच्या सक्षमीकरणाची व दुरुस्तीची कामे वेगाने पूर्ण करण्यावर भर दिला जाईल. राज्यात वेगाने घडणाऱ्या सौर ऊर्जा क्रांतीमुळे औद्योगिक ग्राहकांवरील 'क्रॉस सबसिडी'चा आर्थिक बोजा लक्षणीयरीत्या कमी झाला असून वीज खरेदीमध्ये मोठी बचत होत असल्याने आगामी काळात औद्योगिक व व्यावसायिक वीज दर आणखी कमी होत जातील. भविष्यात सौर ऊर्जेमुळे दिवसा घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक अशा सर्वच वर्गवारीतील ग्राहकांना वीजदरात थेट सवलत मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.

या महत्त्वपूर्ण संवाद कार्यक्रमात नागपूर आणि वर्धा जिल्ह्यातील एमआयडीसी इंडस्ट्रियल असोसिएशन, बुटीबोरी मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशन, वांजरा इंडस्ट्रियल असोसिएशन, लघु उद्योग भारती, नाग विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स, विदर्भ इंडस्टीज असोसिएशन, रुरल विदर्भ इंडस्टीज असोसिएशन यांसह विविध औद्योगिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी सहभाग घेऊन आपल्या मागण्या मांडल्या. त्यावर संचालक औंढेकर यांनी स्थानिक पातळीवरील वीजप्रश्नांचे तातडीने निवारण करण्याच्या सूचना दिल्या.

या बैठकीला नागपूर व वर्धा जिल्ह्यातील कार्यकारी अभियंते अमित शिवलकर, प्रीती फुले, शर्मिला इंगळे, संतोष क्षीरसागर, धम्मदीप फुलझले, राहुल जीवतोडे, डॉ. गजानन जयस्वाल, प्रशांत टेंभेकर, नरेश पारधी आणि प्रदीप घोरुडे यांच्यासह इतर वरिष्ठ अभियंते व अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आरक्षणाचा लाभ पहिल्याच पिढीला मिळावा : देवेंद्र भुजबळ




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

भारतीय समाजात खरीखुरी समानता निर्माण व्हावी यासाठी, ज्या ज्या मागास वर्गाला घटनेने आरक्षण दिले आहे,त्या आरक्षणाचा लाभ पहिल्याच पिढीला मिळावा, जेणेकरून त्या त्या मागास वर्गातील खऱ्याखुऱ्या गरजू मुलामुलींना आरक्षणाचा लाभ मिळेल आणि स्वतःच्याच समाजातील राजकीय, आर्थिक, प्रशासकीय, सामाजिक दृष्ट्या प्रबळ असलेल्या मुलामुलींशी त्यांना स्पर्धा करावी लागणार नाही, असे प्रतिपादन निवृत्त माहिती संचालक देवेंद्र भुजबळ यांनी केले. भूतानमध्ये नुकत्याच झालेल्या पंधराव्या स्वातंत्र्यवीर सावरकर संमेलनाचे स्वागताध्यक्ष तथा प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. भुजबळ पुढे म्हणाले की, स्वातंत्र्यवीर सावरकर, महात्मा गांधी आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातील, कार्यातील एक समान धागा म्हणजे जाती पद्धतीचे निर्मूलन हा आहे.

त्यामुळे या तिन्ही महापुरुषांच्या अनुयायांनी निदान जात व्यवस्थेच्या निर्मूलनासाठी एकत्र येऊन प्रयत्न करण्याची गरज आहे. तसेच ही अपेक्षा सरकारकडून न करता, त्या त्या समाजाच्या मंडळानी, नेत्यांनी,कार्यकर्त्यांनी यासाठी स्वतःहून पुढे आले पाहिजे,असेही आवाहन त्यांनी केले. संमेलनाच्या अध्यक्ष पदावरून बोलताना लेखक सुधीर सेवेकर यांनी त्यांच्या भाषणातून सावरकरांची विद्यान निष्ठा आचरणात आणणे किती महत्वाचे आहे, हे विशद केले. संमेलनाचे प्रास्ताविक करताना,छत्रपती संभाजीनगर येथील स्वातंत्र्यवीर सावरकर मित्र मंडळाचे अध्यक्ष भाऊ सुरडकर यांनी मंडळाच्या वाटचालीचा आढावा सादर केला. संमेलनाचे सूत्रसंचालन प्रा मगर यांनी अतिशय उत्कृष्टपणे केले. या संमेलनात विविध वक्त्यांनी सावरकरांच्या जीवनातील विविध पैलूंवर प्रकाश टाकला. तसेच काही सांस्कृतिक कार्यक्रम देखील सादर करण्यात आले.

## 'बॉलीवूड क्लासिक' सांगीतिक कार्यक्रमाचे ७ ऑक्टोबरला आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

श्री सिद्धिविनायक पब्लिसिटीच्यावतीने 'बॉलीवूड क्लासिक' या विशेष सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन बुधवार, ७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजता शंकरनगर येथील साई सभागृहात करण्यात आले आहे. कार्यक्रमाची संकल्पना व निवेदन समीर पंडित यांचे आहेत. कार्यक्रमात अतिथी गायिका निकेता जोशी यांच्यासोबत विजया वाइनडेस्कर, डॉ. कल्याणी कापसे, मंजुषा दिवटे, समीक्षा चरडे, डॉ. अमृता पारोळकर, वैशाली मून, नीरजा धांडे, शशिकांत वाघमारे, दत्तात्रय वझारकर, हितेंद्र मून, सुनील माहूरकर, पद्मशेखर पनके आणि विवेक प्रतापे विविध गीते सादर करतील. त्यांना की-बोर्डवर परिमल जोशी, गिटारवर ऋग्वेद पांडे, ऑक्टोपॅडवर महेंद्र वटुलकर, ढोलकवर पंकज यादव आणि तुंबावर राजेश धामणकर साथसंगत करणार आहेत.

या कार्यक्रमात प्रवेश निःशुल्क असून, संगीतप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन श्री सिद्धिविनायक पब्लिसिटीच्या वतीने करण्यात आले आहे.

# पंचनाम्याच्या कचाट्यात शेतकऱ्यांना अडकवू नका!

### दुष्काळग्रस्त भिवापूरच्या बांधावर पोहोचले सुधीर पारवे, पिकांची पाहणी करून शासनाकडे सरसकट नुकसानभरपाईची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

पावसाने पाठ फिरवल्याने भिवापूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला जात असताना, आता मदतीसाठी पंचनाम्यांच्या कचाट्यात शेतकऱ्यांना अडकवू नका, अशी रोखठोक मागणी उमरेड विधानसभा क्षेत्राचे माजी आमदार सुधीर पारवे यांनी केली आहे. शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पीक नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी करताना त्यांनी पीक पेरणीच्या उपलब्ध नोंदीच्या आधारे सरसकट नुकसानभरपाई देण्याची मागणी शासनाकडे



केली.

भिवापूर तालुक्यातील चिखलापार, महालगाव, सालेभट्टी दंदे, उरकुडापार, पांजरेपार, नांद, वणी आणि धामणगाव (गवळी) या गावांचा दौरा करून पारवे यांनी सोयाबीन, धान, कापूस तसेच अन्य जिरायती व बागायती पिकांची पाहणी केली. पावसातील मोठी तूट, प्रतिकूल हवामान आणि सततची नापिकी यामुळे पिकांची अवस्था गंभीर असल्याचे यावेळी त्यांच्या निदर्शनास आले. एकीकडे शेतकरी संकटात आणि दुसरीकडे पंचनाम्यांची कागदपत्रे! अशा परिस्थितीत प्रत्येक शेताची स्वतंत्र पाहणी आणि पंचनामे पूर्ण होईपर्यंत मदत रखडण्याची शक्यता आहे. त्यामुळे शासनाने पंचनाम्याच्या पारंपरिक प्रक्रियेत वेळ न दवडता, उपलब्ध पीक पेरणी नोंदी ग्राह्य धरून बाधित शेतकऱ्यांना तातडीने सरसकट मदत द्यावी, अशी भूमिका पारवे यांनी मांडली. पीक पाहणीदरम्यान पारवे यांनी उमरेडचे उपविभागीय अधिकारी विद्यासागर चव्हाण यांच्याशी भ्रमणध्वनीवरून संपर्क साधून तालुक्यातील परिस्थिती त्यांच्या निदर्शनास आणून दिली. शेतकऱ्यांना तातडीने दिलासा देण्यासाठी सकारात्मक कार्यवाही करण्याची मागणीही त्यांनी केली.

शेतकऱ्याच्या बांधावर उभे राहून त्याची व्यथा समजून घेणे ही केवळ पाहणी नाही; संकटाच्या काळात त्याच्या पाठीशी उभे राहण्याची जबाबदारी आहे. शेतकऱ्यांना मदत मिळेपर्यंत शासनस्तरावर पाठपुरावा सुरूच ठेवू, असे पारवे यांनी स्पष्ट केले.

या दौऱ्यात खरेदी-विक्री संस्थेचे सभापती भास्कर येंगळे, भाजपा भिवापूर शहराध्यक्ष अनिल समर्थ यांच्यासह विविध पदाधिकारी, कार्यकर्ते, सरपंच, उपसरपंच तसेच संबंधित गावांतील शेतकरी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दुष्काळाच्या संकटात शेतकऱ्याला कागदोपत्री प्रक्रियेत अडकविण्याऐवजी त्याच्या नुकसानीची दखल घेऊन तातडीने मदत मिळणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांना न्याय मिळेपर्यंत शासनाकडे पाठपुरावा सुरू ठेवणार असल्याचे पारवे यांनी सांगितले.

थोडक्यात

## सावनेर तालुका तायक्वांडो क्लबचे विद्यार्थ्यांची शालेय स्पर्धेमध्ये उल्लेखनीय कामगीरी




**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

स्कुल गेम्स फेडरेशन ऑफ इंडीया २०२६-२७ अंतर्गत आयोजीत दिनांक २६ ते ३० सप्टेंबर जिल्हा स्तरीय व दिनांक १ ते ३ आँक्टोंबर विभागीय स्तरीय तायक्वांडो स्पर्धेत सावनेर तालुका तायक्वाँडोच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगीरी करत विविध पदक पटकवीले, जिल्हा स्तरीय स्पर्धेत १४ वर्षीय मुले व मुली वयोगटात अद्वेद बिसेन याने सुवर्ण पदक, व नेल्सन माटे, इश्वरी मालवे, शामीली जांगडे, हिमांशी बोंबडे, मैशर शेख, सांनी रोप्य पदक पटकावले तसेच शोर्य आवते, ओम सुर्यवंशी, सिद्धांत बाली, वात्सल्य भोंगडे, हिमांशु आमने, रेहाली सोनवाणे यांनी कास्य पदक पटकाविले. तसेच १७ वर्षीय मुले/ मुली वयोगटात फैज शेख, पुर्वा खुसपरे, तनिष्का गुरारीकर, परिणीता जोगी, सायली बनकर यांनी सुवर्ण पदक पटकवले तसेच १९ वर्षीय मुले/मुली वयोगटात रिया गुप्ता हीने सुवर्ण पदक पटकवीले.

तर विभागीय स्तरीय तायक्वांडो स्पर्धेत, अद्वेद बिसेन, पुर्वा खुसपरे तनिष्का गुरारीकर यांनी सुवर्ण पदक पटकावून दिनांक ७ ते ९ आँक्टोंबरला होणाऱ्या राज्य स्तरीय तायक्वांडो स्पर्धेत निवड झाली हे विशेष. सावनेर तालुका तायक्वांडो असोसीएशनचे अध्यक्ष मनोज बसवार,सावनेर तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष किशोर ढुंढेले तसेच युसीएन न्युजचे स्थानिक प्रतिनिधी मुकेश झरबडे यांनी विद्यार्थ्यांचा सत्कार करून पुढील वाटचालीला शुभेच्या दिल्या. विद्यार्थ्यांनी यशाचे श्रेय आई वडीलांना व प्रशिक्षक प्रशांत राऊत, विजय कुहिटे, ऋषिकेश भालेराव, करण नानवटकर, प्रतिक बंभोरे, वृषभ चौधरी, प्रेमकुमार गायकवाड भावेश सहारे यांना दिले. आयोजनाचे संचालन सायली बनकर हिने केले.

## साईबाबांच्या पुण्यतिथी महोत्सवाचे आयोजन



**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

नगरीतील साई मंदिरात दरवर्षी प्रमाणे यावर्षी ही साई बाबांची पुण्यतिथीची साजरा करण्यात येत आहे. करिता खालीलप्रमाणे आयोजित कार्यक्रमास उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी.अशी विनंती साईबाबा मंदिर विश्वस्ताद्वारे केली जात आहे. मंगळवार दि.२०/१०/२०२६ ला पहाटे ४ ते ६ : "श्री" चा अभिषेक, हवन व पूजा,सकाळी ६ ते ७: श्री साईबाबांची आरती, सकाळी ७ ते १२ : श्री साईबाबांची पालखी नगर मिरवणुक, दिंडी पताका, कलश मिरवणुक, भजनी मंडळी एकत्र. दिंडीकरी - श्री संत भारती महाराज सांप्रदायिक हरिपाठ भजन मंडळ, म्हसेपठार (संचालक श्री. महेश कवडकर), दुपारी १२ ते १ : श्री साईबाबांची आरती व साईदर्शन, अल्पोहार तसेच बुधवार दि.२१/१०/२०२६ ला सकाळी ८ ते ९ : श्री साईबाबांची पूजा व आरती, दुपारी ३ ते ६ भजन श्री साईबाबा महीला भजन मंडळ, सावनेर, रात्री ८ ते १० : भजन श्री विश्वकर्मा महीला भजन मंडळ, सावनेर, गुरूवार दि.२२/१०/२०२६ ला सकाळी ८ ते ९: श्री साईबाबांची पूजा व आरती, रात्री ८ ते १०: भजन संध्या आर्ट ऑफ लिव्हिंग परिवार सावनेर,शुक्रवार २३/१०/२०२६, सकाळी ८ ते ९ : श्री साईबाबांची पूजा व आरती, रात्री ८ ते १० : भजन - विठ्ठल रूख्मिनी भजन मंडळ,पांढुर्णा रोड, सावनेर, शनिवार, २४/१०/२०26 सकाळी ८ ते ९ : श्री साईबाबांची पूजा व आरती, दुपारी ३ ते ६ : गोपाळ काल्याचे किर्तन ह.भ.प. श्री. हरिचंद्र वंजारी महाराज म.लाडगाव, ता. काटोल, जि. नागपूर. सायं. ६ ते ७: श्री. साईबाबांची पूजा व आरती महाप्रसाद वितरण शनिवार दि. २४/१०/२०२६ ला रात्री ७ ते १० पर्यंत. आयोजित केलेल्या वरील सर्व कार्यक्रमास आपण तन-मन-धनाने व कुटुंबियांसह सहभागी होवून कार्यक्रमाचा लाभघ्यावा व कार्यक्रमाची शोभा वाढवावी ही विनंती. तसेच सर्व साईभक्तांना विनंती आहे की, सदर कार्यक्रमास ज्या भक्तांना धन, धान्य तथा देणगी देण्याची इच्छा असेल ती साई मंदिर सावनेर येथे स्विकारण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

श्री. साईबाबांची पालखी सरळ साई मंदीर येथून प्रस्थान करून मुख्य मार्गाने-बाजार चौक, राम मंदीर रोड ते होळी चौक ते गांधीपुतळा-अवधुतवाडी, राजकमल चौक, मेन रोड मार्गे भ्रमण करून मुख्य रस्त्याने परत साई मंदीरात पोहचेल. तरी भाविकांनी आपल्या आंगणात रांगोळी पतका लावून पालकीचे स्वागत करावे अशी विनंती आयोजकांतर्फे करण्यात येत आहे.

## जनाबाई शामरावजी ढोक यांचे निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



पिंपळा रोड़, चक्रपाणी नगर, श्रीकृष्ण मंदिर येथील रहिवासी श्रीमती जनाबाई शामरावजी ढोक यांचे निधन झाले. मृत्युसमयी त्याचं वय ८२ होते. बुधवारी मानेवाडा घाटावर अंतिम संस्कार करण्यात येईल. त्यांच्यामागे बराच मोठा आप्तपरिवार आहे.

# ओबीसी विद्यार्थ्यांसाठी १०० नवी वसतिगृहे

## महाज्योतीला एक हजार कोटींचा निधी द्या, मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत मागण्यांवर चर्चा

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**

राज्यातील ओबीसी विद्यार्थ्यांसाठी तालुका स्तरापर्यंत वसतीगृहांची व्यवस्था झाली पाहिजे यासाठी १०० नवी वसतीगृहे बांधावी, विभागीय स्तरावरील वसतीगृहांची संख्या एक हजारापर्यंत वाढवावी तसेच महाज्योतीला एक हजार कोटी रुपये द्यावे. मेंढपाळ, वनवासी आणि अठरापगड जातीतील लोकांच्या विविध समस्या सोडविण्यात याव्यात अशा मागण्या उपसमितीसमोर करण्यात आल्या. त्यावर सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन मंत्रीमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

मंत्रालयात झालेल्या या बैठकीला अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ, वनमंत्री गणेश नाईक, पर्यावरण व वातावरण बदल मंत्री पंकजा मुंडे, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, मृदा व जलसंधारण मंत्री संजय राठोड, माजी मंत्री विजय वडेट्टीवार अँड. मंगेश ससाणे आणि ओबीसी नेते लक्ष्मण हाके उपस्थित होते.

विजय वडेट्टीवार यांनी ओबीसी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवरून अनेक महत्त्वाच्या मागण्या मांडल्या. वसतिगृहे खाजगी तत्त्वावर (पीपीपी) न चालवता ती शासनाच्या विभागानेच चालवावीत आणि सामाजिक न्याय विभागाच्या धर्तीवर ओबीसी विद्यार्थ्यांनाही उच्च दर्जाच्या वसतिगृह व इतर शैक्षणिक सवलती मिळाल्या पाहिजेत, असे त्यांनी स्पष्ट केले.



शासकीय योजनांचा लाभ अकरावीपासून थेट मिळावा आणि विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता लागू करावा, अशी सूचनाही त्यांनी केली. व्यावसायिक आणि बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी ओबीसी विद्यार्थ्यांना शंभर टक्के शिष्यवृत्ती दिली जावी, लोकसंख्येच्या प्रमाणात फेलोशिपच्या जागा वाढवाव्यात आणि 'महाज्योती' या संस्थेला किमान एक हजार कोटी रुपयांचा निधी द्यावा, अशी समान न्यायाची भूमिका वडेट्टीवार यांनी मांडली

वसतिगृहांसाठी जागा उपलब्ध करण्याबाबतही बैठकीत सविस्तर आढावा घेण्यात आला. सध्या नऊ ठिकाणी जागा मिळाल्या असून, दुग्धविकास विभागाच्या १३ व अन्य ११ जागा, तसेच महसूल विभागाच्या १६ जागा वसतिगृहांसाठी उपलब्ध करून देण्याबाबत चर्चा झाली. तसेच, कोणत्या १६ जिल्ह्यांमध्ये तातडीने जागा उपलब्ध करून द्यावयाच्या आहेत, याबाबतही बैठक आयोजित करण्याच्या सूचना महसूलमंत्री बावनकुळे यांनी केल्या.

ओबीसी समाजाच्या विविध प्रश्नांवर मंगेश ससाणे यांनीही महत्त्वपूर्ण मुद्दे मांडले. बाठिया कमिशनच्या अहवालानुसार ग्रामपंचायतीच्या २२ हजार जागा कमी झाल्याने ओबीसींचे सात ते आठ टक्के आरक्षण कमी होण्याची भीती आहे, त्यामुळे राज्य सरकारने याबाबत तातडीने रिव्ह्यू घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली. यासोबतच ओबीसी आंदोलनातील कार्यकर्त्यांवरील गुन्हे मागे घेण्यात यावेत, 'राष्ट्रपिता ते राष्ट्रनेता' अभियान वर्षभर राबवावे आणि कुणबी दाखल्यांच्या प्रश्नावर तोडगा काढावा, असे ससाणे म्हणाले.

लक्ष्मण हाके यांनीही उपसमितीसमोर आपल्या मागण्या मांडताना, ओबीसी महामंडळे केवळ कागदोपत्री न ठेवता ती तातडीने प्रत्यक्ष कार्यान्वित करावीत, अशी आग्रही मागणी केली.

मंत्री गणेश नाईक यांनी सर्व जातींना समान निधी देण्यात यावा आणि अगोदरचा सर्व अनुशेष (बॅकलॉग) भरून काढल्यानंतरच पुढील नियोजन करावे, अशी भूमिका मांडली.

बैठकीच्या शेवटी मंत्री छगन भुजबळ यांनी पुण्यात म. फुले यांचा वाडा आणि त्यापासून ३०० मीटर अंतरावर असलेले क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे संरक्षित स्मारक यांना जोडण्याचा आराखडा तयार करावा, अशी मागणी केली. तसेच, शासकीय नोकरभरतीमध्ये ओबीसी समाजाची भरती अत्यंत कमी प्रमाणात होत असल्याबाबत चिंता व्यक्त करत, सर्व विभाग प्रमुखांना या बैठकीच्या माध्यमातून स्पष्ट सूचना देण्यात याव्यात, अशा सूचनाही मंत्री भुजबळ यांनी दिल्या.

## विदर्भ साहित्य संघाच्या 'ग्रंथ सहवास' येथे सेवासदन महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची भेट

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** अभिजात मराठी भाषा सप्ताहानिमित्त विदर्भ साहित्य संघाच्या 'ग्रंथ सहवास', नागपूर येथे सेवासदन महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. मराठी भाषेचा गौरव, साहित्याची समृद्ध परंपरा आणि



काव्यवाचन यांचा सुंदर संगम घडविणारा हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून डॉ. विनिता हिंगे उपस्थित होत्या. त्यांनी मराठी भाषेचा अभिजात दर्जा, भाषेची प्राचीनता आणि समृद्ध साहित्यपरंपरेची माहिती विद्यार्थ्यांना दिली. यानंतर कवयित्री राधा खानझोडे, डॉ. पद्मिनी घोसेकर, डॉ. मोनाली पोफरे, डॉ. स्मिता आणि माधुरी व्यवहारे यांनी मराठी भाषेवरील विविध आशयांच्या कविता सादर केल्या.

विदर्भ साहित्य संघाच्या ग्रंथालय संचालक डॉ. स्वाती मोहरीर यांनी प्रास्ताविक केले. यावेळी त्यांनी संत ज्ञानेश्वरांची मऱ्हाठी भाषासुंदरी' ही कविताही सादर केली. डॉ. मोनाली पोफरे यांनी सूत्रसंचालन केले, तर माधुरी वाडीभस्मे यांनी आभार मानले. या कार्यक्रमाला सेवासदन महाविद्यालयातील मराठीचे प्राध्यापक डॉ. चंद्रकांत बावनकुळे आणि ग्रंथपाल मंगेश देशमुख यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

## अजय धोटे यांचे निधन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** अमरतृप्ती नगर, बेलतरोडी रोड रहिवासी अजय धोटे याचं निधन झाले. मानेवाडा घाटावर अंतिम करण्यात आले. मृत्युसमयी त्यांचे वय ६० वर्ष होते. त्यांच्या पश्चात पत्नी व मुलगा आणि बराच मोठा आप्त परिवार आहे.

## उत्कृष्ट जेष्ठ नागरिक मंडळ अवार्डकरिता काटोलची निवड

### जिल्ह्यात सर्वाधिक सदस्य संख्या, विविध प्रभावी उपक्रमांची अंमलाबजावणी



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

पूर्व विदर्भ प्रादेशिक विभाग फेसकॉम नागपूर यांचे वतीने जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन निमित्त ४ ऑक्टोबरला महोत्सवात काटोल जेष्ठ नागरिक मंडळ यांचा उत्कृष्ठ प्रशासन व कार्या बद्दल गौरव करण्यात आला. याप्रसंगी मंडळाचे अध्यक्ष गजाननराव भोयर यांना सन्मान चिन्ह शाल,श्रीफळ व गुलाबपुष्प देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी मंडळाचे सचिव अशोकराव काकडे, संचालिक प्रामुख्याने उपस्थित होते. महाराष्ट्र राज्य ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेसकॉम) मुंबई यांच्या उद्दिष्टानुसार काटोल द्वारा ज्येष्ठांसाठी सामाजिक व आरोग्य विषयक तसेच मनोरंजनात्मक विविध कार्यक्रम राबविले जाते. शिवाय ज्येष्ठाकरिता महाराष्ट्र शासनाचे योजना व नियम, अधिकार आदी जनजागृती, ज्येष्ठांना जाणीव करून दिल्या जाते. अडीअडचणीच्या वेळेस ज्येष्ठांच्या मदतीला धावून सहकार्य केले जाते. वरील कार्याची दखल घेऊन, पूर्व विदर्भ प्रादेशिक विभाग फेसकॉम नागपूरद्वारा ज्येष्ठ नागरिक मंडळ काटोल ची नागपूर जिल्ह्यातून उत्कृष्ट ज्येष्ठ नागरिक मंडळ म्हणून निवड करण्यात आली. काटोल नगरीचे नाव उंचविल्या बद्दल मंडळाचे कौतुक होत आहे.

पूर्व विदर्भ प्रादेशिक विभाग फेसकॉम नागपूर यांचेवतीने जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन निमित्त नागपूर येथे ४ ऑक्टोबरला आयोजित केलेल्या महोत्सवामध्ये जेष्ठ नागरिक मंडळ काटोलच्या कार्याचा गौरव करण्यात आला. याप्रसंगी मंडळाचे अध्यक्ष गजाननराव भोयर यांना सन्मान चिन्ह शाल, श्रीफळ व गुलाबपुष्प देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी मंडळाचे सचिव अशोकराव काकडे, संचालिका प्रामुख्याने उपस्थित होते.

## शंकरपटाच्या शौकिनाकडून कर्जबाजारी झाल्यानंतर चोरीचा मार्ग, हिंगणघाटमधील चोरीचाही उलगडा

**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

उमरेड ते नागपूर मार्गावरील रेल्वे क्रॉसिंगजवळील सारडा फॅशन मॉल या कपड्यांच्या दुकानात झालेल्या चोरीचा उमरेड पोलिसांनी छडा लावला असून, या प्रकरणातील आरोपीला अटक करण्यात आली आहे. आरोपीकडून चोरीच्या रकमेसह दुचाकी व मोबाईल असा एकूण १ लाख ६५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

फिर्यादी सुशील सिताराम सारडा यांच्या उमरेड-नागपूर रोडवरील रेल्वे क्रॉसिंगजवळील सारडा फॅशन मॉल या दुकानात २ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास अज्ञात चोरट्याने दुकानाचा शटर तोडून



प्रवेश केला. दुकानाच्या काउंटरमधील ५८ हजार ५०० रुपये रोख चोरून नेण्यात आले. याप्रकरणी ३ सप्टेंबर रोजी उमरेड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याच्या तपासादरम्यान पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे शंकरपट परिसरातील तळ्यातील वस्तीत सापळा रचून सचिन ज्ञानेश्वर मंगर, वय २५ वर्षे, रा. मांजरसोंड, ता. सावली, जि. चंद्रपूर याला ५ ऑक्टोबर रोजी ताब्यात घेण्यात आले.

पोलिसांनी केलेल्या चौकशीत आरोपीकडून चोरी केलेल्या रोख रकमेपैकी ५५ हजार रुपये, तसेच गुन्ह्यात वापरलेली दुचाकी आणि मोबाईल असा एकूण १ लाख ६५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

दरम्यान, आरोपीने हिंगणघाट, जि. वर्धा येथील एका टेक्स्टाईल दुकानातही चोरी केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. यासंदर्भात हिंगणघाट पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३३४ (१), ३०५ (अ) अन्वये गुन्हा दाखल असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

सदरची कारवाई पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार, अपर पोलिस अधीक्षक अनिल मस्के आणि उपविभागीय पोलिस अधिकारी मयांक माधव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोलिस निरीक्षक धनाजी जळक, पोलीस उपनिरीक्षक संदीप सडमेकर, पोलीस अंमलदार राधेश्याम कांबळे, पंकज बडे, चेतन माहुलकर, मंगेश निंबाळे, रमेश टेकाम, आकाश गवळी तसेच उमरेड व सायबर शाखेतील पोलिस कर्मचाऱ्यांनी कारवाईत सहभाग घेतला.

## ९.८२ लाखांच्या निधीतून उभारलेला आरओ प्लांट अद्याप बंदच

### दीड-दोन वर्षांपासून सुविधा तयार, नागरिकांना मात्र शुद्ध पाण्याची प्रतीक्षा

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

रामटेक तालुक्यातील मनसर येथील शासकीय रुग्णालयाजवळ ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद नागपूर यांच्या माध्यमातून सुमारे ९ लाख ८२ हजार रुपयांच्या निधीतून उभारण्यात आलेल्या आरओ (जलशुद्धीकरण) प्लांटच्या कार्यक्षमतेबाबत आणि निधीच्या वापराबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. काम पूर्ण झाल्याचे सांगितले जात असले तरी हा प्लांट अद्याप नागरिकांच्या वापरासाठी सुरू झालेला नसल्याने शासनाचा खर्च झाल्यानंतरही अपेक्षित सुविधा उपलब्ध झालेली नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, या कामासाठी सन २०२३-२४ अंतर्गत निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. त्यानंतर सन २०२४ मध्ये कामाला सुरुवात करण्यात आली. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, प्लांटचे काम पूर्ण होऊन सुमारे दीड ते दोन वर्षांचा कालावधी लोटला आहे. मात्र, अद्याप या प्लांटला प्रभावी जलस्रोताशी जोडून शुद्ध पाणीपुरवठा सुरू करण्यात आलेला नाही. त्यामुळे लाखो रुपये खर्चून उभारण्यात आलेली यंत्रणा प्रत्यक्ष वापराविना पडून असल्याचे चित्र आहे.



सदर जलशुद्धीकरण केंद्राचा लाभ मनसरमधील वॉर्ड क्रमांक १, २, ३ आणि ४ मधील नागरिकांना होऊ शकतो. या परिसरातील सुमारे पाच ते सहा हजार नागरिकांना या सुविधेचा फायदा मिळण्याची शक्यता आहे. प्लांट कार्यान्वित झाल्यास नागरिकांना शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध होण्यास मदत होऊ शकते.

जलशुद्धीकरण केंद्रासाठी सुमारे ९.८२ लाख रुपयांचा निधी खर्च करण्यात आला असेल, तर प्रत्यक्षात नागरिकांना त्याचा लाभ अद्याप का मिळत नाही, असा प्रश्न स्थानिक नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. कामाची तांत्रिक व प्रशासकीय मंजुरी कोणत्या आधारावर देण्यात आली, कार्यादेश कोणाला देण्यात आला, काम कधी पूर्ण झाले आणि कामाची प्रत्यक्ष गुणवत्ता कोणत्या पद्धतीने तपासण्यात आली, याबाबत स्पष्टता मिळावी, अशी नागरिकांची मागणी आहे.

तसेच कामाची मोजमाप पुस्तिका (एम.बी.), कार्यपूर्णता प्रमाणपत्र, संबंधित बिल-वाउचर आणि करण्यात आलेली देयके यांची तपासणी करण्यात यावी, अशी मागणीही पुढे आली आहे. प्लांटमध्ये वापरण्यात आलेली यंत्रसामग्री व अन्य साहित्य निर्धारित तांत्रिक मानकांनुसार आहे किंवा नाही, याचीही तपासणी करण्याची मागणी होत आहे. प्लांट अद्याप सुरू न होण्यामागे तांत्रिक अडचण, जलस्रोताची अनुपलब्धता किंवा अन्य कोणते कारण आहे, हे संबंधित विभागाने स्पष्ट करावे, अशी अपेक्षाही व्यक्त होत आहे.

या प्रकरणात जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागातील संबंधित अधिकारी, उपविभागीय स्तरावरील अभियंते, कनिष्ठ अभियंते तसेच पंचायत समिती व तालुका स्तरावरील संबंधित अधिकाऱ्यांची भूमिका आणि जबाबदारी तपासण्यात यावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. चौकशीत कोणतीही तांत्रिक किंवा आर्थिक अनियमितता आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

दरम्यान, या कामामध्ये एका स्थानिक स्वयंघोषित जिल्हा परिषद नेत्याच्या कथित आर्थिक हितसंबंधांबाबत काही नागरिकांनी शंका व्यक्त केली आहे. मात्र, या आरोपांची स्वतंत्रपणे पुष्टी झालेली नाही. त्यामुळे संबंधित व्यक्तीची या कामातील भूमिका किंवा कोणत्याही आर्थिक व्यवहाराचा संबंध आहे अथवा नाही, हे अधिकृत आणि निष्पक्ष चौकशीनंतरच स्पष्ट होऊ शकते.

स्थानिक नागरिकांनी राज्य शासन तसेच संबंधित विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष तांत्रिक व आर्थिक चौकशी करण्याची मागणी केली आहे.

चौकशीचा अहवाल सार्वजनिक करण्यात यावा आणि प्लांट तांत्रिकदृष्ट्या वापरण्यायोग्य असल्यास त्याला आवश्यक जलस्रोताशी जोडून तो तातडीने सुरू करावा, अशी मागणीही करण्यात आली आहे.

शासकीय निधीतून उभारण्यात आलेली सुविधा केवळ कागदोपत्री न राहता प्रत्यक्ष नागरिकांच्या उपयोगात यावी, अशी अपेक्षा स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे. ९.८२ लाख रुपयांच्या निधीतून उभारण्यात आलेला हा आरओ प्लांट अखेर कधी सुरू होणार, हा प्रश्न सध्या मनसरमधील नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.